शुक्रवार, १६ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१२१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 16 DECEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-121 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

## कर्मचाऱ्यांचा पाणी पुरवठा योजनेतही 'डबल गेम'

### ६ जिल्ह्यांमध्ये झाली १७ कोटी २८ लाखांची कामे

आधुनिक केसरी न्यूज

**सिंचनाचा बट्ट्याबोळ भाग-३**

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध पाणी पुरवठा योजना दिलासा जनविकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविल्या गेल्या. माहिती अधिकारात प्राप्त माहितीत राज्य शासनाच्या योजनेत काम केलेले कर्मचारी केंद्र शासनाच्या योजनेत देखील काम करताना आढळले आहेत. विशेष म्हणजे ज्या कर्मचाऱ्यांनी औरंगाबाद जिल्ह्यात अध्यक्ष, सचिव म्हणून काम पाहिले, तेच इतर जिल्ह्यातील पाणी पुरवठ्याचे अध्यक्ष व सचिव असल्याचे समोर आले आहे. ६ जिल्ह्यांमध्ये सुमारे १७ कोटी २८ लाखांच्या कामाची योजना राबविली गेली. हा प्राप्त निधी देखील परजिल्ह्यातील बँकेच्या खात्यात नव्हेतर औरंगाबादेतील बँकांमध्ये जमा झाला आहे. (सविस्तर पान-3 )

## है तयार हम



महामोर्चाच्या आढाव्यासाठी महाविकास आघाडीतील नेत्यांची बैठक विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या शासकीय निवासस्थानी देवगिरी येथे गुरूवारी पार पडली. यावेळी माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, कॉंग्रेसचे नेते पृथ्वीराज चौहान, कॉंग्रेसचे नेते नसीम खान आदींनी माध्यमांशी संवाद साधला.

## दिलासा : नुकसान भरपाईत दुप्पट वाढ

### प्रती हेक्टर ६ हजार ८०० ऐवजी १३ हजार ६०० रुपये मिळणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने मोठा दिलासा दिला आहे. नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये प्रती हेक्टर दुप्पट वाढ करण्यात आली आहे. महसूल व वनविभागाने हा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे जिरायत पिकाच्या नुकसानीसाठी 6 हजार 800 रुपयांऐवजी आता 13 हजार 600 रुपये मिळणार आहेत. बागायत पिकांच्या नुकसानीसाठी 13 हजार 500 ऐवजी आता 27 हजार रुपये मिळणार आहेत.**



बहुवार्षिक पिकाच्या नुकसानीसाठी 18 हजार ऐवजी आता 36 हजार रुपये मिळणार आहेत. सरकारने नुकसानीची मर्यादाही वाढवली आहे. दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टरपर्यंत मदत मिळणार असल्याचे या शासन निर्णयात म्हटले आहे. राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि शेतजमिनींचे मोठे नुकसान झाले होते. बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून पीके आणि शेतजमिनीच्या नुकसानीसाठी 22232.45 लाख रुपये इतका निधी वितरीत करण्यास सरकारने मंजूरी दिली आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात या निधीची तरतूद पुरवणी मागण्याद्वारे करण्यात येईल. त्यानुसार हा निधी विभागीय आयुक्तांना किंवा शासनाचे आदेश येतील त्याप्रमाणे वितरित करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. जून ते ऑक्टोबर, 2022 या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळं राज्यातील विविध जिल्ह्यात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वाढीव दराने मदत देण्याबाबत महसूल विभागाने शासन निर्णय घेतला आहे. यानुसार आता शेतकऱ्यांना जिरायत पिकाच्या नुकसानीसाठी 6 हजार 800 रुपयांऐवजी आता 13 हजार 600 रुपये मिळणार आहेत तर बागायत पिकाच्या नुकसानीसाठी 13 हजार 500 ऐवजी आता 27 हजार रुपये मदत शेतकऱ्यांना मिळणार आहे.



**जिल्हाधिकाऱ्यांना देखील सूचना :** शासन निर्णयात म्हटले आहे की, पंचनामे करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात यावेत . या शासन निर्णयानुसार संपूर्ण रक्कम बीम्स प्रणालीवर वितरीत करण्यात येत असली तरी लाभार्थी निश्चित झाल्यानंतर वित्तीय शिस्तीच्या दृष्टिकोनातून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गरजेनुसारच कोषागारातून रक्कम आहरित करुन त्यानंतरच शासन निश्चित करेल अशा पद्धतीने लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने रक्कम हस्तांतरीत करावी, असं शासन निर्णयात म्हटले आहे .

## थंडीची लाट येणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सोमवारपासून महाराष्ट्रासह गुजरातमध्ये थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. सातत्याने बदल होत आहे. कधी थंडी तर कधी पाऊस पडत आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणी तर अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. याचा मोठा फटका राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना बसला आहे. दरम्यान उद्यापासून पुढील तीन दिवस हिमाचल प्रदेश, पंजाब आणि राजस्थानमधील बिकानेर, चुरू झुंजनू, हनुमानगड जिल्ह्यात वातावरणात बदल झाला असून, तिथे थंडीची लाट येण्याची शक्यता जेष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तवली आहे. तर दुसरीकडे पुढच्या तीन दिवसांनतर म्हणजे सोमवारपासून महाराष्ट्रासह गुजरातमध्ये थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता माणिकराव खुळे यांनी व्यक्त केली आहे. राज्यातील वातावरण बदलत आहे. अनेक जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. दरम्यान पुढील दोन ते तीन दिवसानंतर म्हणजे साधारण सोमवारी 19 डिसेंबरपासून संपूर्ण गुजराथ आणि महाराष्ट्रात किमान तापमानात 3 डिग्रीने हळूहळू घसरण हणार आहे. त्यामुळं थंडीत दिवसागणिक वाढ होण्याची शक्यता असल्याचे खुळे यांनी सांगितले.

वाशिम जिल्ह्यात रात्री उशिरा पुन्हा अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. सलग दोन दिवसापासून वाशिम जिल्ह्यात अवकाळी पाऊस पडत आहे. या पावसामुळे रब्बी पिकांचा धोका वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. सततच्या ढगाळ वातावरणामुळे आधीच पीक संकटात आल्यानंतर आता अवकाळी पाऊस सुरु झाला आहे. त्यामुळे खरीप पिकानंतर आता रब्बी पिकांचे काय होणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडलाआहे. या अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंतेत आहेत. नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर आणि शाहादा परिसरात जोरदार पाऊस झाला आहे.

## तमाशाला वेळेचे बंधन आल्याने खरा आनंद मिळत नाही !

### तमाशा कलावंतांची व्यथा; सर्वेक्षण करून कलावंताना मानधन द्या : शिवकन्या बढे

आधुनिक केसरी न्यूज

शांताराम मगर

लोणी खुर्द : पेशवाई काळापासून महाराष्ट्रात तमाशा हे मनोरंजनाचे मुख्य साधन मानले जाते मात्र सरकारने वेळेचे बंधन घालून दिल्याने तमाशा कलावंताची आधोगती होत आहे. तसेच प्रेक्षकांची आभिरुची बदलल्याने गण, गैळण, भारुड, पोवाडे, वगनाट्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांना बगल देऊन प्रेक्षकांच्या मागणीनुसार हिंदी- मराठी चित्रपटांच्या गाण्यांवर कार्यक्रम सादर करावे लागतात. पूर्वी वगनाट्य हे तमाशाचे मुख्य आंग होते तमाशा सादरीकरणाला वेळेचे बंधन आल्याने सादरीकरणाचा खरा आनंद मिळत नसल्याची खंत महिला ढोलकी पट्टू शिवकंन्या बढे नगरकर यांनी वैजापुर तालुक्यातील लोणी खुर्द येथे व्यक्त केली.




सध्याच्या डिजीटल जमान्यात गणगौळणबरोबरच नवीन-नवीन गाणी प्रेक्षकांच्या मागणीबरोबर सादर केली जात आहेत. वगनाट्यामध्येही बदल घडवून नवनवीन विषय हाताळले जात आहेत. प्रेक्षकातुन पिच्चर टॉकीज पेक्षा तमाशा मंडळांना मोठी मागणी असून यात्रा आठवडे बाजार आशा ठिकाणी दिवस एक तमाशा मंडळ मुक्कामी थांबत आहे. 110 कलाकारांचा संच घेवून तमाशा कलेच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधन आलेले तमाशा मंडळे करत आहेत. त्यांतच प्रेक्षकांची हुल्लडबाजी आदी गोष्टींचा सामना करावा लागत असल्याची खंत ढोलकीपटू शिवकन्या बढे यांनी दैनिक आधुनिक केसरीशी बोलताना व्यक्त केली. कलावंताना स्वतःचे घर व जमीन नासल्यामुळे उतार वयात हाल होतात मात्र मजबुरी आणी तमाशाची आवड आसल्याने आमच्यासारखे हजारो तमाशा कलावंत महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात जाऊन मनोरंजनाच्या माध्यमातून जनजागृतीचे काम करत आहे. त्यामुळे कलावंताचे सर्वेक्षण करुन कलावंताना मनधन द्या जेनेकरुण कलावंतांना सन्मानाने जगता येईल आणि महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी कलावंत मनापासून घडपड करतील, पण त्यासाठी मायबाप सरकारने मायेचा हात कलावंतांच्या पाठिवर पडणे आवश्यक आहे, असे शिवकन्या बढे यांनी दैनिक आधुनिक केसरीशी बोलताना सांगितले. त्यावेळी त्याचे डोळे पाणावले होते. यावेळी लोणी गावच्या वतीने शिवकंन्या बढे यांच्यासह कालाकाराच शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



### शासनाने तमाशाकलावंतांच्या मुलांसाठी शाळा सुरु केल्या पाहिजे

खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नसल्यामुळे महाराष्ट्र तुन सर्कस हद्दपार झाली . त्याप्रमाणे तमाशा लोककला थोड्याच दिवसात हद्दपार होणार असल्याचे सांगितले 50 तमाशा फारुकी 7 फड चालू आसून तेही शेवटच्या घटका मोजत आहेत . शिवाय सततच्या फिरतीमुळे शासनाकडून मिळणाऱ्या आनेक सोई – सुविधा तसेच योजनांच्या लाभापासून तमाशातील कलावंत दुर राहत आसून कलावंताना मिळणारे फायदे अन्य व्यक्तीच घेत आहेत . पूर्वापार चालत आलेली महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी यातमाशाकलावंताना महाराष्ट्र फिरवावेत लागते, त्यामुळे मुलाबाळांच्या शिक्षणाचे यामुळे नुकसान होते . दर्जेदार शिक्षण घेण्याची कितीही ईच्छा आसली तरी त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नासल्याने शेवटी त्यांची मुले तमासगीरच होत आहेत . त्यामुळे शासनाने तमाशाकलावंतांच्या मुलांसाठी शाळा सुरु केल्या पाहिजे ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी शाळा आहेत मग तमाशा कलावंताची का नको ?




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## जगातील पहिले प्रेमपत्र

आधुनिक केसरी

आजकाल मोबाईलच्या वापरामुळे पत्रलेखन जवळपास थांबल्यासारखेच झाले आहे. पण काही वर्षांपूर्वीचा काळ म्हणजे आपल्या आवडत्या व्यक्तीच्या पत्राची वाट पाहण्याचा काळ होता. पत्र लिहिणाऱ्याच्या भावना पत्रात उतरत आणि ते ज्याला लिहिले आहे त्याच्यापर्यंत जाऊन पोहोचत. म्हणून तर प्रिय व्यक्तीची पत्रे जपून ठेवली जात. त्यांची पुन्हा पुन्हा पारायणे होत असत. हिंदी चित्रपटात तर या गोष्टीचा उपयोग करून गीतलेखकांनी अनेक गाणी लिहिली आहेत. आणि ती कमालीची लोकप्रिय होऊन लोकांच्या ओठांवर आली. नायिकेने नायकाला प्रेमपत्र लिहावे, पोस्टमन हा त्यांच्यामधला पत्र पोहोचवणारा दूत. कधी कधी नायिकेला पत्र लिहिता येत नाही. मग ती पोस्टमनलाच सांगते. खत लिख दे सावरियाके के नाम बाबू कोरे कागज पे लिख दे सलाम बाबू वो जान जायेंगे, पहचान जायेंगे. त्या नायिकेला एवढा विश्वास आहे की आपले फक्त नाव असलेले पत्र त्या



प्रियकराला मिळाले की बाकी सगळं तो समजून जाईल. पण तुम्हाला माहित आहे का की रुख्मिणीने श्रीकृष्णाला लिहिलेले पत्र हे जगातील पहिले प्रेमपत्र असावे. किती बुद्धिमान म्हणावी रुख्मिणी ! आणि तिच्या धाडसाचे कौतुक करावे तेवढे कमीच. मी असे का म्हणतो त्याला कारण म्हणजे त्या वेळची परिस्थिती. रुख्मिणी ही विदर्भराजा भीमकाची सुंदर आणि बुद्धिमान कन्या. लहानपणापासूनच श्रीकृष्णाच्या पराक्रमाच्या कथा तिच्या कानावर आल्या होत्या. आणि त्या ' सावळ्या सुंदरास ' तिने मनानेच वरले होते. पण तिचा भाऊ रुख्मी हा श्रीकृष्णाचा द्वेष करणारा होता. त्याच्या मनात तिचा विवाह शिशुपालाशी व्हावा अशी इच्छा होती. शिशुपाल हा सुद्धा श्रीकृष्णाचा द्वेष करणारा होता. रुख्मीने आपल्या बहिणीवर म्हणजे रुख्मिणीवर अनेक बंधने लादली होती. ती तिच्या स्वतःच्या मर्जीने कोठेही जाऊ शकत नव्हती. अशा वेळी तिच्या हातात काहीही नव्हते. तिचे आईवडील सुद्धा रुख्मीपुढे हतबल झाले होते. त्यामुळे अशा परिस्थितीत तिच्या डोक्यात श्रीकृष्णाला पत्र लिहिण्याचा विचार येणे ही गोष्टच तिच्या बुद्धिमत्तेची निदर्शक आहे. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### घर हे केवळ चार भिंतींचेच नसते

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

खरे तर इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच.



आधुनिक केसरी

### तोच सदाचार | विठु ठायी ||

अंगी बाणा थोडा | सात्विक विचार ||
योग्य तो आचार | सज्जनांचा ||१||
परोपकार तो | स्वधर्म जाणावा ||
आपुला मानावा | निंदक ही ||२||
दया क्षमा अंगी | रूजवावी जरा ||
मायेचा अंगारा | भाळी शोभे ||३||
चंदनाच्या संगे | चंदनचि व्हावे ||
दुर्गंधा जाळावे | विकारांच्या ||४||
श्वासात पेरावा | संतांचा विचार ||
तोच सदाचार | आचरावा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी

### भक्ती

रक्तकुसुमशोभिते रुप्यमुकुटधारिणि । मां पश्य पश्य पाहि मां माये कृपे दये परे ।।४।। आरक्त कुसुम तुझ्या हाती शोभून दिसते. तू चांदीचा मुकुट धारण करतेस. माये, कृपे, दये, श्रेष्ठ देवी, तू माझे रक्षण कर. रक्षण कर.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

**साक्षब्रम्ह--समर्थ म्हणतात साक्षित्वात पदार्थांना वेगळेपणाने पाहणे असते पण जेथे पदार्थच नाहीत तेथे साक्षित्वाला वावच उरत नाही. म्हणून साक्षब्रम्ह खरे नाही. **सगुणब्रम्ह-- जे जे गुणांनी वेढलेले आहेत ते ते नाशवंत असते,असा प्रत्यक्ष अनुभव येतो. त्याला इतर प्रमाणाची गरज नाही.द्रुष्य सगळे गुणमय असते म्हणून सगुणब्रम्ह नाशवंत आहे. निर्गुणब्रम्ह--गुणमय द्रुष्य जीवनहा शब्दांचा प्रांत आहे. जेथे गुण नाहीत तेथे शब्द पोहचू शकत नाहीत. तर "निर्गुण"हा केवळ एक शब्द आहे. त्याने कोणती वस्तु दर्शवली जात नाही. गुणच नाही तर वस्तु नाही तर वर्णन कोणाचे करायचे. ज्ञानी पुरूष असे सांगतात की माया ही मिथ्या आहे. ती म्रुगजळासारखी आहे. आपण पहातो हे विश्व कल्पनेचे आहे. जे गावचं अस्तित्वात नाही त्याची हद्द कशी दाखवणार. तात्पर्य असे की जथे गुणमय द्रुष्य विश्वच म्रुगजळासारखे आहे ते अस्तित्वात नाही तेथे गुणांना ओलांडून रहाणारे निर्गुण ब्रम्ह खरे मानता येत नाही. मायेच्या पसा-यात सत्ता वावरते.पदार्थाच्या पसा-यात जाणतेपणा वावरतो अविद्येच्या पसा-यात चित्तशक्तिचा खेळ चालतो. सत्ता, साक्षित्व,चित्तशक्ति या कल्पना ,माया,द्रुष्यपदार्थ आणि अज्ञान यातुन निर्माण होतात. पण या तिन्ही गोष्टी गुणांच्या कक्षेत आहेत याठिकाणी कल्पनाच कमी पडतात. सारांश काय तर जे गुणरहित परब्रम्ह ते निर्गुण या शब्दाच्या खुणेने सांगायचे इतकेच. पणतो शब्द व त्याने दर्शवलेला संकेत दोन्ही अशाश्वत आहेत असे समजावे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

**वाच्यब्रम्ह--गुणरहित ब्रम्हाला खुणेने ओळखण्यासाठी पुष्कळ नावे देतात. म्हणून त्यांना वाच्यब्रम्ह म्हणतात. तें सगळे नाशवंत आहेत. **अनुभवब्रम्ह --आनंदब्रम्ह--प्रत्येक जीवाला आनंदाचा अनुभव सदोदित येत रहातो. त्यामुळे "मी आनंदाचा अनुभव घेतो"अशी त्रिपुटी त्यामध्ये असते. अनुभव घेणारा मी ज्याचा अनुभव घ्यायचा तो आनौद ,आणि प्रत्यक्ष अनुभव असे तीन घटक वेगळे पणाने भासतात म्हणून आनंदब्रम्ह आणि अनुभवब्रम्ह दोन्ही माणसाच्या मनाचे व्यापार असतात अर्थात हे दोन्ही नाश पावतात.
**तदाकारब्रम्ह--ब्रम्हाशी तदाकार झाल्यावर तेथे व्रुत्ती राहू शकत नाही. जोपर्यंत अविद्येचा लेश असतो तोपर्यंत व्रुती निर्माण होतात. त्या व्रुत्तीला अभ्यासाने तदाकार होण्याची सवय लावली की ती तदाकार होते. परंतु अविद्या संपूर्ण नाहीशी होईपर्यंत व्रुत्ती पुन्हा खाली येते. याच विचाराने ज्ञानी पुरूषाच्या पाय-या असतात. म्हणून तदाकारब्रम्ह पूर्ण ब्रम्ह नाही. **अनिर्वाच्यब्रम्ह--ब्रम्हाला जेव्हा अनिर्वाच्य असे म्हणतात तेव्हा व्रुत्तीच्या अनुरोधाने खुण म्हणून तो शब्द योजतात. सर्व साधारणपणे आपले पदार्थ ज्ञान व्रुत्ती प्रधान असते. असे ज्ञान अर्थरूप असल्याने कमीजास्त प्रमाणात शब्दांनी व्यक्त करता येते ते वाच्य असते. परंतु ब्रम्हाशी तदाकारता झाल्यावर व्रुत्ती उरतचं नाही जेथे व्रुत्ती उरली नाही जे वाच्य नाही ते अनिर्वाच्य होय. अनिर्वाच्य शब्द अखेर व्रुत्तीच्या संबधाने योजला जातो. म्हणून ब्रम्ह अनिर्वाच्य आहे हे म्हणणे सुध्दा गौणचं समजावे.

## वेळीच जागे होऊन योग्य रस्त्याला लागा

आधुनिक केसरी

कोणत्याही कर्माची सुरुवात हेतूपासून म्हणजे वासनेपासून होत असते. जन्म हा देखील वासनेतून निर्माण होतो. गंगेचा उगम अत्यंत पवित्र आणि लहान असला तरी स्वच्छ असतो. त्याप्रमाणे, आपला जन्म वासनेत झाला असला तरी सुरुवातीला मूळ स्वरूप निर्मळ असते. याच वेळी आई लहान मुलाला शिकवते, ' देवा चांगली बुद्धी दे, ' पुढे या निर्मळ मनावर निरनिराळ्या बर्‍यावाईट वासनांचे पगडे बसू लागतात. गंगेचे पाणी पुढे पुढे वाहात गेल्याने गढूळ होते. आणि ते स्वच्छ करण्यासाठी आपण ज्याप्रमाणे तुरटी लावतो, त्याप्रमाणे वासनेचा गढूळपणा घालविण्यासाठी 'राम कर्ता' ही भावना दृढ करायला पाहिजे. भगवंताच्या नामाची तुरटी फिरल्याने वासनेचा साका खाली राहून शुद्ध अंतःकरण प्रकट होईल. ' गेल्या जन्मात मी जी काही पापे केली असतील ती आता भोगतो आहे, ' असे नुसते म्हणून जगण्यात अर्थ नाही, कारण त्यामुळे आपण पुढच्या जन्माची तयारीच करीत असतो. जर पुढचा जन्म चुकवायचा असेल तर या जन्मीच त्यासाठी कार्य करायला पाहिजे; म्हणजे ती वासना नष्ट केली पाहिजे. सत्तावान्, श्रीमंत, वैभववान् माणसे सुखी असतात, हा नुसता भ्रम आहे. जोपर्यंत यांना भगवंताचा आधार नसतो तोपर्यंत या



सर्व गोष्टी कुचकामाच्या आहेत. आपले प्रापंचिक सुख आहे ते दिसायला वरवर बाळसेदार दिसते, परंतु ती सूज आहे, हे काही खरे बाळसे नव्हे. म्हणून आपल्याला प्रपंचात सुख लागत नाही. आपले वय जसजसे वाढत जाते, तसतसे आपले व्याप वाढतात आणि परमेश्वराकडे दुर्लक्ष होते. वासना कमी होण्याऐवजी वाढत जाते, आणि तीच पुढल्या जन्माची अधिष्ठात्री ठरते. तेव्हा यातून काहीतरी मार्ग वेळेलाच काढणे आवश्यक आहे. हा मार्ग अगदी सरळ आणि सोपा आहे. संतांनी तो अनेक वेळा दाखवून दिला आहे. त्या मार्गाने पावले टाका, भगवंत पुढला मार्ग दाखवायला उत्सुक आहे. तुम्हाला हे सर्व पटले असे म्हणता, परंतु पटले असून करीत नाही. बरे, पटले नाही म्हणावे, तर का पटले नाही तेही सांगत नाही, याला काय करावे ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणीमात्रापेक्षा जर काही जास्त असेल तर ते म्हणजे चांगलेवाईट कळण्याची बुद्धी. तेव्हा तुमच्या बुद्धीला पटूनही जर तुम्ही तसे वागला नाही किंवा नुसता प्रयत्नही केला नाही, तर तो दोष सर्वस्वी तुमचाच नव्हे का ? म्हणून मला पुनः सांगावेसे वाटते की, वेळेलाच जागे होऊन योग्य रस्त्याला लागा. भगवंताच्या नामात राहून सर्व काय ते करा, हेच माझे शेवटचे सांगणे आहे. **आजचे बोधवचन आहे**-नामावर बळकट श्रद्धा ठेवून परमार्थ करू या. नाम न सोडता इतर गोष्टी करू.

# परजिल्ह्यातही पाणी पुरवठा योजना 'रामभरोसे'

## राज्यासह केंद्राच्या योजनेतही फसवेगिरी


आधुनिक केसरी न्यूज

**ज्या गावाची पाणी पुरवठा योजना, त्या गावच्या पाणी पुरवठा समितीत तेथील रहिवासी अध्यक्ष आणि सचिव असावा हा नियम आहे. परंतु या नियमाची जिल्ह्यातच नव्हे तर इतर जिल्ह्यातदेखील वाट लावण्यात आली. दिलासा जन विकास प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने औरंगाबादेत राज्य शासनाच्या योजना राबविल्यानंतर त्यांनी इतर जिल्ह्यात देखील केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा योजनेचे काम हाती घेतले. यात बुलढाणा, लातूर, जालना, नांदेड, परभणी जिल्ह्यांतील वॉटर शेडच्या कामासाठी १७ कोटी २८ लाखांच्या निधीचा समावेश आहे. येथेही संस्थेने केलेल्या कामात मोठा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे.**


**नेमका असा आहे घोळ :** दिलासा जन विकास प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून नार्बाडमार्फत राबविल्या जाणाऱ्या वॉटर शेड योजनेचे इम्प्लीमेंट करण्याचे काम दिले होते. या माध्यमातून कच्ची घाटी, मुरुमखेडा, घागरा, कुऱ्हाडी, वरखेडा, बिलोरा, पिंपळगाव, लतिफपूर, नांदखेडा, करोही आणि कोनेवाडी या गावांचा समावेश होता. या ठिकाणी नार्बाडमार्फत १७ कोटी २८ लाख रुपयांचा निधी स्थानिक ग्रामसमितीच्या खात्यावर जमा करण्यात आला होता. परंतु आधुनिक केसरीने याचा तपास केला असता अनेक गावांतील ग्राम समित्यांवर असलेले अध्यक्ष व सचिव हे कर्मचारी होते व त्या गावातील रहिवासी नसलेल्यांच्या खात्यावर निधींची रक्कम जमा झाली.


### दोन ठिकाणी तेच अध्यक्ष व सचिव

- रवि बोराडे हा प्राप्त माहितीनुसार कर्मचारी असून तो फुलंब्री तालुक्यातील वावना गावातील पाणलोट समितीचा अध्यक्ष होता. तर, जिंतूर जिल्ह्यातील घागरा या गावातील पाणलोट समितीचाही तोच सचिव म्हणून नियुक्त झाला.
- विलास तारो राठोड हा अलाहाबाद तांडा गावातील रहिवासी असताना तो औरंगाबादेतील माळेगाव ठोकळ २ येथील पाणलोट समितीचा सचिव होता, नंतर जालना जिल्ह्यातील बेलोरा गावातही तोच सचिव होता. तो वरिल गावातील रहिवासी नसल्याचे तेथील ग्रामपंचायतीने लेखी स्वरुपात दिले आहे.
- नवनाथ ढाकणे बिडकीन, औरंगाबाद येथील रहिवासी असून तो जिंतुर जिल्ह्यातील कुऱ्हाडी या गावातील पाणलोट समितीचा सचिव होता.
- निजाम शेख हा लतीफपूर, जालना येथील रहिवासी नसून तो लतीफपूर येथील पाणलोट समितीचा सचिव म्हणून कार्यरत होता.



सदरील गावात कामे झाले की नाही, याबाबत नाबार्ड कार्यालयाला माहिती मागविण्यात आली, तेव्हा संबंधित माहिती काम झालेल्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. माहिती अधिकारात परभणी येथील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांना मागितली, तेव्हा त्यांनी जिंतूर तालुक्यातील घागरा आणि कुऱ्हाडी या गावात कोणतीही कामे नाबार्ड मार्फत झाले नसल्याचे उत्तर दिले. त्यामुळे कोट्यवधींच्या कामाचा पैसा मुरला कुठे ? याचा नव्याने शोध घेण्याची गरज आहे. विशेष म्हणजे यातील कर्मचाऱ्यांचे बँके खातेदेखील औरंगाबाद येथील बँकेत असल्याचे समोर आले.






केंद्र सरकार मार्फत परजिल्ह्यात राबविण्यात आलेल्या वॉटर शेड योजनेत जे कर्मचारी अध्यक्ष व सचिव म्हणून होते तेच कर्मचारी औरंगाबाद जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या राज्य शासनाच्या योजनेत देखील तेच अध्यक्ष व सचिव होते.



छतावरील पावसाचे पाणी साठवणाऱ्या टाक्या.



छतावर पडणारा पाऊस थेट बोअरमध्ये सोडला आहे.



# आरोग्यम हॉस्पिटलचे रविवारी सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील स्त्रीरोग व बालरोग उपचारांसाठी नावलौकिक मिळवणाऱ्या आरोग्यम हॉस्पिटल आपल्या ५० बेड्सच्या सुसज्ज वास्तूत स्थलांतरित होत आहे. आरोग्यम पेडियाट्रिक सुपरस्पेशालिटी, मॅटर्निटी व आयव्हीएफ सेंटरचालोकार्पण सोहळा रविवारी (१८ डिसेंबर) केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. आरोग्यम पेडियाट्रिक सुपरस्पेशालिटी, मॅटर्निटी व आयव्हीएफ सेंटरचे वैद्यकीय संचालक नामांकित बालरोग तज्ञ डॉ. सुनील सरोदे व प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. शामली सरोदे यांनी वैद्यकीय कसब, अहोरात्र परिश्रम व दुर्दम्य अशा इच्छाशक्तीच्या जोरावर



अल्पावधीत वैद्यकीय क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. अविरत रुग्णसेवेचे व्रत उराशी बाळगून त्यांनी या वैद्यकीय क्षेत्राला व्यवसाय न मानता सेवाभावाच्या माध्यमातून जनसामान्यांना आरोग्य सेवा देणारे सरोदे दाम्पत्य अशीही त्यांची ओळख आहे. सर्वसामान्यांना परवडेल अशा दरात गेल्या पाच वर्षांपासून एन-११ टीव्ही सेंटर परिसरात वैद्यकीय व्यवसाय करत आहेत. या दिमाखदार अशा वास्तूतआरोग्यम पेडियाट्रिक सुपरस्पेशालिटी, मॅटर्निटी व



आयव्हीएफ सेंटरचे लोकार्पण रविवारी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते होईल. आपल्या क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव असणारे नवजात शिशू अतिविशेषोपचार तज्ञ डॉ. राहुल खरात पाटील हे याठिकाणी एन आयसीयू प्रमुख असून पेडियाट्रिक क्रिटिकल केअरचाव्यासंग असणारे डॉ. अविनाश शेळके पाटील हे पी. आयसीयू प्रमुख आहेत. हे येथे पूर्णवेळ उपलब्ध असणार आहेत. आपल्या कार्य कौशल्याने प्रसिद्ध असणारे डॉ. अजिंक्य मिस्त्री व नम्रता मिस्त्री हे दंतरोग विभागातसेवा देण्यासाठी तत्पर असतील. रुग्णांचे उपचार हे अधिक सुखकर व आल्हाददायक होण्यासाठी 'केअर विथ कम्फर्ट' या ब्रीदवाक्यालाअनुसरून हॉस्पिटलचा अनुभवीस्टाफ व कर्मचारी सेवेसाठी तत्पर आहेत.

# अंधारेंच्या अडचणी वाढणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वारकरी संतांच्याबाबत शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर अडचणी वाढल्या आहेत. अंधारे यांनी माफी मागितल्यानंतरही वारकरी संप्रदाय शांत होण्यास तयार नसून आता राज्यभर सुषमा अंधारे यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याची तयारी विश्व वारकरी संघाने सुरु केल्याचे अध्यक्ष जगन्नाथ महाराज देशमुख यांनी जाहीर केले आहे. वारकरी संतांच्याबाबत वक्तव्यानंतर काल सुषमा अंधारे यांनी माफी मागितली असली तरी यावर वारकरी संप्रदायाचे समाधान झालेले नसून त्यांचे विरोधात राज्य सरकारने गुन्हा दाखल करण्याची मागणी विश्व वारकरी संघाच्या तुकाराम चौरे महाराज यांनी केली आहे.

# महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रश्नी ज्येष्ठ विधिज्ञ हरीश साळवे यांची नियुक्ती करा

## अजित पवार : केंद्रसरकारच्या मनात असेल तर यातून 'दूध का दूध, पानी का पानी होऊ दे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नावरुन दिल्लीत बैठक बोलावली होती. महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्न न्यायालयात आहे. आज विनियोजन बिलासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आहे त्या बैठकीत आपल्या राज्याची भक्कम बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ हरिश साळवे यांची नियुक्ती करावी अशी मागणी उपमुख्यमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे अजित पवार यांनी आज माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.
दिल्ली येथे बैठकीत जे झाले ते मिडियामध्ये पहायला मिळाले की, मराठी माणसाला जायला यायला आणि गाड्यांची अडवणूक होणार नाही. किंवा कोणताही त्रास होणार नाही. हा प्रश्न सुप्रीम कोर्टात आहे. त्याचा निकाल काय लागतो हे आता न्यायव्यवस्थेच्या हातात आहे. मात्र कारण नसताना कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी हा वाद निर्माण केला त्यांनी अशी वक्तव्य केली नसती तर असे प्रकार घडले नसते आणि वातावरण खराब झाले नसते.गाडया फोडल्या गाड्यांना काळं फासलं मराठी भाषिकांना जो त्रास झाला तो झाला नसता या सगळ्या गोष्टीमुळे महाराष्ट्राच्या सीमेवर वेगवेगळ्या गावांमध्ये मत प्रदर्शित झाले आमचा विकास झाला नाही तर आम्ही राज्य सोडून जाणार अशाप्रकारची भावना वाढीला लागली. ही राज्याच्यादृष्टीने अडचणीची आहे तसे होता कामा नये. यातून कर्नाटक सरकारने सामंजस्य भूमिका घेतली पाहिजे आणि राज्यसरकारने पण आक्रमक भूमिका घेतली



पाहिजे असेही मत अजित पवार यांनी व्यक्त केले. गृहमंत्री अमित शहा यांनी याअगोदर एक बैठक घ्यायचे ठरवले होते त्यावेळीसुद्धा बोम्मई यांनी वक्तव्य केले होते की जाईन न जाईन माझा अधिकार आहे. पण काल त्यांनी समंजस भूमिका घेतली असे दिसते आहे. अर्थात तिथे जे ठरले आहे त्याची कृती मात्र दोघांकडून झाली पाहिजे आणि चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात आणि सीमा भागात जो भाग आपल्यात यावा अशी आग्रही मागणी करतो तसे वातावरण तयार करण्यासाठी सर्वांनी कबूल केल्याप्रमाणे वागले पाहिजे असेही अजित पवार म्हणाले. काल चर्चा त्या बैठकीत झाली. यामागे सुत्रधार कोण आहे? का असे घडले? आंदोलन, विरोध झाला. ट्वीटवर जाणीवपूर्वक बातम्या सोडल्या गेल्या आणि लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या. त्या भावनांचा उद्रेक झाला आणि त्यातून या सगळ्या गोष्टी घडल्या. काहींना वाटते की, हे विरोधकांनी केले आहे अशी संशयाची सुई ठेवली जात आहे आमचे स्पष्ट मत आहे आम्ही कधीही देशाच्या किंवा राज्याच्या एकसंघतेला कुठे धक्का लागणार नाही यातून चुकीचे घडणार नाही असा दृष्टीकोन आम्ही राजकीय पक्ष ठेवत असतो तरीपण कुठलीही शंका- कुशंका केंद्रसरकारच्या मनात असेल तर यातून 'दूध का दूध, पानी का पानी पुढे आले पाहिजे. पारदर्शकता आली पाहिजे आणि खरंच कुणी यामागे मास्टरमाईंड आहे आणि कशामुळे हे निर्माण झाले शोधून काढला पाहिजे. बोम्मई यांनी वक्तव्य केले नसते. एका राज्याच्या प्रमुखाने ज्या राज्यात वर्षानुवर्षे गावे महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून निपाणी, कारवार, बेळगाव मागतो आहोत. तिथल्याबद्दल वक्तव्य झाले. त्यानंतर जत तालुक्यासाठी झाले असे जे काही प्रकार झाले त्यातून निश्चितपणे महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लावण्याचे काम हे करत आहेत. अशी भावना महाराष्ट्रवासियांमध्ये, सीमावासियांमध्ये निर्माण झाली होती. त्यातून हा प्रकार घडला असे स्पष्ट मतही अजित पवार यांनी मांडले.

# पाकिस्तानला सुनावले

आधुनिक केसरी

भारताची फाळणी झाल्यापासून पाकिस्तानशी असलेले आपले संबंध ताणलेलेच राहिले आहेत. गेल्या ७५ वर्षांमध्ये हे संबंध सुधारण्यात दोन्ही बाजूच्या सरकारांना वेळोवेळी अपयश आल्याचे दिसून आले आहे. किंबहुना पाकिस्तानकडून अनेकदा हा राजकीय मुद्दा केला गेल्याचेही स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये बोलताना भारताने पाकिस्तानला दहशतवादी कारवायांवरून परखड शब्दांत खडसावले आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सुरक्षा परिषदेतील चर्चेदरम्यान बहुपक्षीयता आणि संयुक्त राष्ट्राच्या सक्षमीकरणावर बोलताना पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. UNSC मध्ये जागतिक पातळीवरील आव्हानांविषयी चर्चा सुरू असताना भारताची बाजू मांडणारे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला धारेवर धरले. आज आपण संयुक्त राष्ट्राच्या बहुपक्षीयतेमध्ये मूलभूत सुधारणेची गरज व्यक्त करत आहोत. आपल्याला आपापली मतं असणारच आहेत. पण संयुक्त राष्ट्राची कार्यक्षमता ही सध्याच्या घडीतील महत्त्वाच्या समस्यांचा कशा प्रकारे सामना केला जातो, यावर अवलंबून असणार आहे. मग ती समस्या एखाद्या आजाराच्या साथीची असो, हवामान बदलाची असो, आंतरराष्ट्रीय वादाची असो किंवा मग दहशतवादाची असो, असे जयशंकर आपल्या भाषणात म्हणाले. अशा प्रकारच्या समस्यांमुळे निर्माण होणारी परिस्थिती कायमस्वरूपी राहणे हे आपण मान्य करू शकत नाही. अवघ्या जगाने ज्या गोष्टी अस्वीकारार्ह ठरवल्या आहेत, त्यांचे समर्थन करण्याचा मुद्दाच उपस्थित व्हायला नको. एखाद्या राष्ट्राकडून दुसऱ्या देशांमध्ये दहशतवादी कारवाया करण्याला पाठिंबा देणंही त्याचाच एक भाग आहे. ओसामा बिन लादेनला आश्रय देणाऱ्यांना किंवा शेजारी देशाच्या संसदेवर हल्ला करणाऱ्यांना या परिषदेसमोर उपदेश देण्याचा नैतिक अधिकार नाही", अशा शब्दांत जयशंकर यांनी पाकिस्तानला सुनावलं. दरम्यान, जयशंकर यांच्याआधी पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो यांनी काश्मीर मुद्दा उपस्थित करत द्विपक्षीय संबंध सुधारण्यासाठी यावर उपाय शोधण्याची गरज व्यक्त केली. संयुक्त राष्ट्राच्या सक्षमीकरणासाठी त्याचे लोकशाहीकरण करणे गरजेचे आहे. काश्मीर अजूनही एक प्रलंबित मुद्दा आहे. जर तुम्हाला परिस्थिती सामान्य करायची असेल, तर काश्मीरच्या मुद्द्यावर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने पारित केलेल्या तरतुदींची अंमलबजावणी केली जायला हवी, असे भुट्टो आपल्या भाषणात म्हणाले होते. दरम्यान, या मुद्द्यावरून आता दोन्ही देशांमधील राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

# हक्कासाठी जरुर लढा पण कायद्याचे भान ठेवून



कॉ. के. के. जामकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

"गलत नितीयों का विरोध हमेशा खुल कर करो, चाहे राजनिती हो या समाज | इतिहास हमेशा आवाज उठाने वालों का लिखा जाता है, तलवे चाटने वालों का नही| "चुकीच्या गोष्टीचे समर्थनकुणीही करु नये, चुक ही चुकच असते, मग ती कळत नकळत केलेली असो अथवा जाणुन बुजून केलेली असो. मित्रहो, मागच्या काही दिवसापासून नांदेड जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटनेचे जि. प. प्रशासना विरोधात असहकार आंदोलन सर्व सामान्य जनतेमध्ये व विशेषत: शासकीय खात्यातील बुद्धीजीवी कर्मचाऱ्यामध्ये मोठ्या चविने चर्चिल्या जात आहे. कुठलेही व कुणाचेही आंदोलन असो त्यात शासन प्रशासनाकडे सार्वजनीक अथवा वैयक्तिक हिताच्या मागण्या तर असणारच व त्या पदरात पाडुन घेण्यासाठी कायदेशीर अथवा दबावतंत्राच्या माध्यमातुन प्रयत्नही असणारच.



कुठल्याही संघटनेने आपल्या मागण्या संदर्भात व त्या पदरात पाडुन घेण्यासाठी संघटना पदाधिकाऱ्यांना कायदा व नियमाच्या अधिन राहूनच संघर्ष केल्यास किंवा त्या सार्वजनिक हितार्थ असल्यास शासन व प्रशासनाला मागण्या मान्यतेस्तव नक्किच सकारात्मक व संवदेनशिल राहुन विचार करावा लागतो, व काही अंशी का होईना कुठल्याही व्यवस्थापनाला त्या सोडविण्यास्तव भाग पडते. पण जर मागण्या कायदेशिर अथवा नियमबाह्य असतील तर शासन अथवा प्रशासन अशा मागण्याला भिक घालत नाही. जर शासन-प्रशासन अथवा संघटना यापैकी कुणीही बेकायदेशिर किंवा नियमबाह्य कांही हरकती करत असेल तर त्यात चुकिचे संदेश जावून प्रकरण अंगलट येवून बदनामी अथवा चुकिच्यामार्गाचे अवलंब केल्या प्रकरणी दोषपात्र गुन्हा ठरु शकतो. जसे न्यायालयात एखाद्या प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने अपेक्षित असल्यास त्यासाठी साक्षी पुराव्यासह "CASE LAW REFERENCES" म्हणजेच कायदेशिर हवाले देवूनसाक्षी पुराव्यासह आपली बाजू न्यायालयापुढे समर्थपणे मांडल्यास निवाडा त्या पद्धतीने म्हणजेच आपल्या बाजूने लागु शकतो. परंतु हे सर्व केंव्हा साध्य होवू शकते जेंव्हा आपण आपली बाजु भक्कम पुराव्यानिशी व कायद्याच्या चौकटीत राहुन केल तरच अन्यथा त्यासाठी आवश्यक असते ती बुद्धी कौश्यलता तथा कायदा व नियमाचा परिपूर्ण अभ्यास अथवा जनाधार अन्यथा सर्व प्रकरणाचा निकाला नकारार्थी अथवा नापास सारखाच असतो. वर्तमान परिस्थितीत कुठल्याही शासकिय अथवा निमशासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्याबाबत जनसामान्याचे मत फारसे चांगले नाही कारण शासक-अधिकारी-कर्मचारी हे आपण जनतेचे सेवक आहोत त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास न होता जनतेची सर्व कामे सुरळीत, सुव्यवस्थित व प्रमाणिकपणे निश्चित कालमर्यादेत मध्ये झाली पाहिजेत हे आम जनतेला वाटते. पण बहुतांश शासकिय व प्रशासकिय व्यवस्था ही भ्रष्टाचारात गुंतलेली असल्यामूळे व यांची मुजोरी वाढल्यामुळे सर्व सामान्याच्या मनात अशा व्यवस्थेबाबत तिरस्कार निर्माण झाल्याचे आपण सर्रास बघतो. शासकिय काम आण सहा महिने थांब याचाच अर्थ असा की, शासकिय कार्यालयातील बहुतांश कामे कागदावर आर्थिक वजनठेवल्याशिवाय पुढे सरकतनाहीत तेही नित्याचीच बाब आहे. याला अधिकारी-कर्मचाऱ्यासह पूर्ण प्रशासकिय यंत्रणाच जबाबदार आहे. वर्तमानात तर शासनकर्तेही खुप मोठ्या प्रमाणात यात गुंतलेली दिसतात, जनता बिचारीही याला सक्षमपणे जाब विचारु शकत नाही. त्यामूळे सर्वच स्तरावरील प्रशासकिय यंत्रणा निर्ढावलेली दिसते. शासकिय खात्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभाराबाबत तर न बोलणेच बरे, नेहमीच होणाऱ्या राजकीय हस्तक्षेप व आंदरुनी पाठींब्यामुळे विविध पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याचे फावून त्यांच्यातही मुजोरी वाढून संघटनात्मक दबाव तंत्राचा वापर करुन गैर मार्गाने वैयक्तिक हित साधल्या जाते हे आता लपून राहिलेले नाही. म्हणूनच संघटनेचे पदाधिकारीही मुजोर व बेजबाबदार होवून वाटेल त्या गैरकायदेशीर मागण्या पदरात पाडून घेतात, त्यातलाच एक प्रकार म्हणजेच आपल्या जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटेनेने पुकारलेले असहाकर आंदोलन. जेंव्हा कुठल्याही शासकिय अथवा निमशासकीय खात्यातील कर्मचारी सेवेत रुजु होतो तेंव्हा त्याच्यावर सेवाशर्ती व कायदेशीर नियमानुसार निश्चितच बंधने असतात. याचा विसर बऱ्याच अंशी संघटनेच्या नेत्याला पडलेला प्रकर्षाने जाणवतो. बहुतांश संघटना पुढारी मंडळीही स्वतःला राजकिय पुढारी म्हणूनच वावरत असल्याचे वर्तमानातील दृष्य आहे. पुढारीपणा करत असताना नुसते स्टार्च केलेले कपडे घालुन चालत नाही तर त्यासाठी लागतो तो प्रामाणिक, निस्वार्थ कायदे व नियमाचा अभ्यास, आजकाल उठसुट कुणीही जातीपाती, धर्म व केडरच्या नावावर संघटना काढुन व्यवस्थापणावर दबावतंत्राचा वापर करुन पैसा उकळण्याचा धंदा या पुढाऱ्यात राजकिय पुढाऱ्यापेक्षा जास्त प्रमाणात वाढलेला दिसतो. संघटना पुढारी हे संघटना पुढारीच असले पाहिजेत राजकिय पुढाऱ्याचा साज त्यांनी अंगावर चढवून घेवू नये. शिवाय कामगार कर्मचारी यांच्याहितासाठीच प्रमाणिक व निस्वार्थपणे अभ्यासूवृत्तीने कायदे व नियमाच्या अधिन राहुनच काम केले पाहिजे. खरेच एखाद्या कर्मचाऱ्यावर अन्याय झाला असेल तर अभ्यासुवृत्तीने सामोरे जावून त्यांना न्याय मिळवून दिला पाहिजे दबाव तंत्राचा वापर करुन नव्हे. म्हणतात ना "कर नाही तो डर काहे का" या उक्तीप्रमाणे स्वतः प्रामाणिक असू तर कितीही चौकशाला सामारे जावे लागले तर न डगमगता न घाबरता त्याचा मुकाबला करुन समोरच्याचे भले केले पाहिजे तरच संघटनेच्या नेतृत्वाचे भले हावून दोघावरचाही विश्वास कायम टिकतो. स्थानिक वृत्तपत्रातील बातमी आधारे आता ग्रामसेवकांचे निलबंन प्रकरण आमदार देवेंद्र भुयार मार्फत विधान भवनात पोहचले. मला असे वाटते की, शेवटी हे बहुसंख्य ग्रामसेवकांचे निलंबन प्रकरण पडद्यामागुन मॅनेज होते की काय ? शेवटी सदर प्रकरणी दुध का दुध पाणी का पाणी होते की पाण्यातच दुध राहते याचा अंदाज येणारा काळ ठरविल म्हणून कर्मचारी या नात्याने आपला प्रामाणिकपणा सिद्ध करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी कोणत्याही व कितीहीवेळा चौकशीसाठी सिद्ध करा. आपले निर्दोषत्व सिद्ध व्हावे असे जनतेला व प्रामाणिक कर्मचारी वर्गाला वाटते. म्हणून हक्कासाठी प्रामाणिकपणे जरुर लढावे पण कायदे व नियमाचे भान ठेवूनच अन्यथा भान गेलेल्या माणसासारखी अवस्था जरुर होते.

# सकारात्मक बदल



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

२१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते कारण या शतकात अनेक क्रांतिकारक शोध लागले त्यातीलच एक शोध म्हणजे मोबाईलचा शोध. मोबाईलचा शोध लागल्यापासून अनेक क्षेत्रात क्रांतिकारक बदल झाले. पूर्वी मोबाईल हे फक्त संदेशाच्या देवाणघेवाणीपुरतेच मर्यादित साधन होते. त्याचा वापरही मर्यादितच होता मात्र मोबाईलमध्ये इंटरनेटचा प्रवेश झाला आणि मोबाईल ही गरजेची वस्तू न राहता चैनीची वस्तू बनली.

मोबाईलचा वापर मर्यादित आणि कामापूरता केला तर त्याचे अनेक फायदे आहेत मात्र अलीकडे सोशल मीडिया आल्यापासून मोबाईलचा अतिरेकी वापर होऊ लागला आहे. भारतात तर मोबाईलचा अतिरेकी वापर ही मोठी समस्या बनली आहे. एकवेळ जेवायला नाही मिळाले तरी जगेल मात्र मोबाईल शिवाय जगू शकणार अशी आपली अवस्था झाली आहे. आपली तरुण पिढीतर मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की एक क्षण देखील ते मोबाईल पासून दूर राहू शकत नाही. तरुण पिढीच्या या मोबाईल व्यसनावर समाज तज्ज्ञांनिही चिंता व्यक्त केली असून हे मोबाईलपवेड असेच कायम राहिले तर भविष्यात तरुण पिढीवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो असा इशाराच समाज तज्ज्ञांनी दिला आहे. मोबाईलचा अतिरेकी वापर ही केवळ आपल्याच देशाची समस्या आहे असे नाही तर जगभर ही समस्या आहे. भारतात मात्र ही समस्या अधिक प्रमाणात आहे. मोबाईल वापरात भारतीय जगात तिसऱ्या क्रमांकावर आहेत. भारतीय दररोज सरासरी चार तास मोबाईल वापरतात. मोबाईल वापरकर्त्यांमध्ये शालेय विद्यार्थीही मागे नाहीत कोरोना काळापासून शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल वापराचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे अनेक समस्याही उदभवू लागल्या आहेत त्यामुळेच अमेरिकेतील काही शाळांनी शाळेत मोबाईल वापरावर बंदी घातली आहे. आपल्या महाराष्ट्रातही एका गावाने मुलांच्या मोबाईल वापरावर बंदी घातली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील बांशी गावातील ग्रामपंचायतिने १८ वर्षाखालील मुलांना मोबाईल वापरण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे गावतील सर्व नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. बांशी ग्रामपंचातीचा हा निर्णय स्वागतार्ह असून सर्वत्र याचे स्वागत होत आहे. मोबाईलचा मुलांवर सकारात्मक नव्हे तर नकारात्मकच परिणाम होत आहे. मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे मुलांमध्ये नकारात्मकता वाढत चालली आहे. मुले चिडखोर बनली आहेत. मोबाईल मिळाला नाही तर मुले हिंसक होत आहेत. मोबाईलमुळे मुलांच्या डोळ्यावर ताण येत आहे त्यामुळे अनेक मुलांना लहान वयातच चष्मा लागत आहे. मोबाईलमुळे मुलांची ग्रहण क्षमताही कमी होऊ लागली आहे त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर झाला आहे. काही वर्षांपूर्वी मैदाने मुलांनी ओसंडून व्हायचे. मुले मैदानावर जाऊन मैदानी खेळ खेळत त्यामुळे त्यांची शारीरिक क्षमताही वाढत अलीकडे मात्र मुले मैदानावर कमी आणि मोबाईलमध्येच अधिक दिसतात. मैदानी खेळ खेळण्यापेक्षा मुलांना मोबाईलवर खेळ खेळण्यात आनंद वाटत आहे त्यामुळे त्यांचे शारीरिक आणि बौद्धिक आरोग्य बिघडत चालले आहे. एकाच ठिकाणी बसून राहिल्याने मुलांमध्ये लठ्ठपणाही वाढत चालला आहे. या सर्व समस्यांचे एकमेव कारण म्हणजे मोबाईल. बांशी ग्रामपंचायतीप्रमाणे इतरही ग्रामपंचायतिने १८ वर्षाखालील मुलांच्या मोबाईल बंदीचा निर्णय घेतला तर ते मुलांच्या हिताचे ठरेल. बांशी ग्रामपंचायतीप्रमाणे उस्मानाबाद जिल्ह्यातील जेकुकरवाडी या गावाने देखील संध्याकाळी ६ ते ८ टीव्ही, मोबाईल सह सर्व इलेक्ट्रॉनिक गॅझेट वापरण्यावर बंदी घातली आहे. संध्याकाळी ६ ते ८ हा वेळ फक्त मुलांच्या अभ्यासासाठी राखून ठेवण्यात आला आहे. या दोन तासात मुलांचे पालकही मुलांसोबत बसून मुलांचा अभ्यास घेतात. सांगली जिल्ह्यातील मोहित्यांचे वडगाव या गावाने देखील संध्याकाळी सात ते साडेआठ दरम्यान इलेक्ट्रॉनिक गॅझेट वापरावर बंदी घातली आहे. बांशी, जेऊकरवाडी आणि मोहित्यांचे वडगाव या गावांनी घेतलेले हे निर्णय सकारात्मक असून मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने अतिशय योग्य आहेत. या तिन्ही गावांचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. या तिन्ही गावाचे अनुकरण राज्यातील इतर गावांनी केले तर मुलांच्या मोबाईलचे व्यसन सुटेल आणि नवी पिढी शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम बनेल.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वाढती लोकसंख्या आणि गडद होत चाललेले अन्न संकट



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जगाची लोकसंख्या आठ अब्जांच्या पुढे गेली आहे. अवघ्या तेवीस वर्षांच्या कालावधीत जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढली. येत्या काही दशकांमध्ये प्रादेशिक असमानतेसह लोकसंख्या वाढतच जाईल. संयुक्त राष्ट्रांच्या मते, ही लोकसंख्या 2030 पर्यंत 8.5 अब्ज, 2050 पर्यंत 9.7 अब्ज आणि 2100 पर्यंत 10.4 अब्जपर्यंत पोहोचू शकते. लोकसंख्येच्या बाबतीत भारत पुढील वर्षी चीनला मागे टाकेल. सर्वात जास्त लोकसंख्या असलेला तो नंबर एकचा देश बनेल. भारताची लोकसंख्या सध्या 1.04 टक्के वार्षिक दराने वाढत आहे. ज्या वेगाने लोकसंख्या वाढत आहे, त्या वेगाने येणाऱ्या काळात एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे पोट कसे भरणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण हवामान बदलामुळे केवळ उपजीविका, पाणीपुरवठा आणि मानवी आरोग्य धोक्यात येत नाही, तर अन्नसुरक्षेलाही आव्हान निर्माण होत आहे. अन्नसुरक्षा हे जगातील अनेक देशांना आज भेडसावत असलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक आहे.**

आज जगाची लोकसंख्या जसजशी वाढत आहे, तसतसा नैसर्गिक साधनसंपत्तीवरही स्पष्टरित्या दबाव वाढत आहे. आज वाढती लोकसंख्या आणि कमी होत जाणारी संसाधने हा संपूर्ण जगासाठी शाप आहे, कारण लोकसंख्येच्या प्रमाणात संसाधने मर्यादित आहेत. त्यामुळेच सुमारे आठ अब्ज लोकसंख्येचा भार वाहणारी ही पृथ्वी लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांच्या निराकरणाच्या प्रतीक्षेत आहे. जगाच्या लोकसंख्येच्या 61 टक्के लोकसंख्या एकट्या आशिया खंडामध्ये आहे. भारत जगाची महासत्ता होण्यात हाच सर्वात मोठा अडथळा आहे. सध्या भारताची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या अठरा टक्के आहे. प्रदेशाचा विचार करता आपल्याकडे 2.5 टक्के जमीन आणि चार टक्के जलस्रोत आहेत. अशा परिस्थितीत झपाट्याने वाढणारी लोकसंख्या ही देशाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांची जननी बनून देशासमोर धोक्याची घंटा बनू शकते. आज लोकसंख्या वाढ हे देशाच्या प्रत्येक समस्येचे मूळ बनत आहे.

गरिबी, उपासमार, बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य सेवा, गुन्हेगारी, शुद्ध पाण्याचा अभाव इत्यादींमागे लोकसंख्या वाढीचेही प्रमुख कारण आहे. एवढेच नाही तर देशातील 60 टक्के जमिनीवर शेती असूनही सुमारे 20 कोटी लोक उपासमारीचे बळी आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट आहे, लोकसंख्येच्या विस्फोटामुळे संसाधनांच्या अपुरेपणामुळे उद्‌भवलेल्या समस्या प्रत्येकाला प्रभावित करत आहेत. मग तो कोणत्याही धर्माचा असो अथवा जातीचा. सध्या भारताची लोकसंख्या 1.39 अब्ज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनींवरच अतिक्रमण होत आहे. लागवडीयोग्य जमीन कमी होत आहे, खाणारी तोंडे वाढत आहेत. अशा परिस्थितीत सर्वांना शेतीतून अन्न पुरवणे हे नवे आव्हान असेल. स्वातंत्र्यानंतर देश अन्नधान्याच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी होऊ शकला नाही, ही विडंबना आहे, पण आज शेतजमिनीच्या इतर वापरात झपाट्याने बदल होत आहेत, शेतकरी शेतीपासून दूर जात आहेत, यामुळे जी भारतात अन्न सुरक्षेची समस्या आहे. त्याचा धोका आणखी वाढू शकतो. शेतजमिनीच्या ऱ्हासामुळे भारताच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीवरही परिणाम होत आहे. नापीक जमिनीचे लागवडीयोग्य जमिनीत रूपांतर करण्यात सरकारला काही प्रमाणात यश आले असले तरी, आपल्या देशातील शेतीयोग्य जमीन वर्षानुवर्षे कमी होत आहे, हेही वास्तव आहे.

'वेस्टलँड ॲटलस 2019' नुसार, पंजाबसारख्या कृषी राज्यांमध्ये 14,000 हेक्टर आणि पश्चिम बंगालमध्ये 62,000 हेक्टर लागवडीयोग्य जमीन कमी झाली आहे. त्याच वेळी, उत्तर प्रदेश या सर्वाधिक लोकसंख्येच्या राज्यात हा आकडा सर्वात चिंताजनक वाटू शकतो, जिथे विकासकामांमुळे दरवर्षी अठ्ठेचाळीस हजार हेक्टर शेतजमीन कमी होत आहे. विशेष म्हणजे, 1992 मध्ये ग्रामीण कुटुंबांकडे 11.7 कोटी हेक्टर जमीन होती, जी 2013 पर्यंत घटून केवळ 9.2 कोटी हेक्टरवर आली. अवघ्या दोन दशकांत 2.2 कोटी हेक्टर जमीन ग्रामीण कुटुंबांच्या हातातून निसटल्याचे स्पष्ट झाले आहे. हाच कल कायम राहिला तर पुढील वर्षापर्यंत भारतातील लागवडीखालील क्षेत्र केवळ आठ कोटी हेक्टर राहील, असे बोलले जात आहे.

लोकसंख्या नियंत्रणाच्या नावाखाली अनेक योजना सुरू केल्या गेल्या, पण त्या यशस्वी होऊ शकल्या नाहीत, हे खरे. लोकसंख्येसाठी राष्ट्रीय धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे. वाढत्या लोकसंख्येचा देशाच्या विकासावर परिणाम होत आहे. योजनांचा लाभ मोठ्या लोकसंख्येपर्यंत समान प्रमाणात वितरित करणे शक्य होत नाही, त्यामुळे अनेक दशकांनंतरही आपण गरिबी, बेरोजगारी यांसारख्या समस्यांवर मात करू शकलो नाही. लोकसंख्या वाढली की मग गरिबांची संख्या वाढणे साहजिक आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स 2022 च्या अहवालानुसार भारतातील 16.3 टक्के लोकसंख्या कुपोषित आहे. पाच वर्षांखालील 35.5 टक्के मुलांची वाढ खुंटलेली आहे. भारतात 3.3 टक्के मुलांचा पाच वर्षापूर्वी मृत्यू होतो. फूड अँड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन (FAO) च्या 'द स्टेट ऑफ फूड सिक्युरिटी अँड न्यूट्रिशन इन द वर्ल्ड' अहवालानुसार, जगभरात 80 कोटीहून अधिक लोक उपासमारीने त्रस्त आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जगातील प्रत्येक दहावा माणूस भुकेलेला आहे. एवढेच नाही तर अजूनही सकस आहार हा जगभरातील 310 कोटी लोकांच्या आवाक्याबाहेरचा आहे. हे स्पष्ट आहे की जगभरात संयुक्त राष्ट्रांचे सर्व कार्यक्रम आणि प्रयत्न असूनही अन्न विषमता आणि कुपोषण अद्याप नष्ट झालेले नाही. अन्न आणि कृषी संघटनेच्या मते, देशांमधील संघर्ष, हवामान बदल आणि आर्थिक मंदी हे याचे प्रमुख कारण आहे. कोरोना महामारीने ही दरी आणखी वाढवली आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे जगभरात तेल, नैसर्गिक वायू, कोळसा इत्यादी ऊर्जा संसाधनांवर दबाव वाढला आहे, जे भविष्यासाठी मोठ्या धोक्याचे लक्षण आहे. भलेही आपण विकासाच्या फुशारक्या मारत राहिलो, पण सत्य हे आहे की जगभर भुकेचे गंभीर संकट उभे राहिले आहे. अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन म्हणतात की अन्न समस्येचे मुख्य कारण केवळ अन्नपदार्थांची कमतरता नाही तर लोकांच्या क्रयशक्तीचा अभाव हे देखील आहे.




दुसरीकडे, एका अंदाजानुसार, संपूर्ण जगात तीस टक्के धान्य वाया जाते. शेतकरीही लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्य उत्पादन करू शकत नाही. महागाई वाढण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. अशा परिस्थितीत जगातील मोठ्या लोकसंख्येला उपासमारीतून बाहेर काढण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

लोकसंख्या नियंत्रण आणि अन्नधान्य उत्पादनात वाढ याबाबत भारतच नव्हे तर संपूर्ण जगाने विचार करण्याची गरज आहे. या दोन्ही समस्या सोडवण्यासाठी जागतिक स्तरावर नाविन्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. भारत हा जगातील अशा देशांपैकी एक आहे जिथे अन्नधान्याचे दरडोई उत्पादन खूपच कमी आहे. येथे फक्त श्रीमंत मध्यमवर्गीय शेतकरी आणि व्यापाऱ्यांना पुरेसे आणि योग्य अन्न मिळू शकते. उर्वरित गावकरी, मजूर, छोटे शेतकरी, आदिवासी, मध्यमवर्गीय लोकांसमोर अन्नधान्याचा प्रश्न वाढत आहे. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी पशुपालन आणि धान्याऐवजी भाजीपाल्यांचे उत्पादन आणि वापर हा असा उपाय आहे, ज्याच्या मदतीने हे उपाय ब-याच अंशी शक्य आहेत. कुटुंब नियोजन आणि अन्नधान्य उत्पादनाचे कार्यक्रम सरकारने राबवले पाहिजेत.

# सर्वांचा लाडका लक्ष्मिकांत बेर्डे

आधुनिक केसरी









संपूर्ण महाराष्ट्राला ज्यांनी खळखळून हसवले सर्वांच्या ह्रदयावर अधिराज्य गाजवले. असा सर्वांचा लाडका, हास्य अभिनेता लक्ष्मिकांत बेर्डे यांचा १६नोव्हेबर हा स्मृतीदिन आहे. लक्ष्मिकांत बैर्डे यांना मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीत मानाचे स्थान मिळाले. आपल्या अभिनयाची छाप त्यांनी पाडली.विनोदाच्या माध्यमातून रसिक चाहत्यांचे मनोरंजन केले.

लक्ष्मिकांत बेर्डे यांचा जन्म रत्नागिरी येथे १९५४रोजी झाला त्यांचं बालपण मुंबई येथे चिखलवाडी येथे गेले. गणेशोत्सवाच्या कार्यक्रमातून अभिनयाला सुरूवात केली.शाळा व महाविद्यालयातून त्यांनी नाटकांमध्ये वेगवेगळ्या भुमिका साकारल्या. टुरटुर नाटकाद्वारे त्यांना खर्या अर्थाने ओळख मिळाली.१९८४मध्ये लेक चालली सासरला या चित्रपटातुन मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले.

यांनतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. धुमधडाका, अशि ही बनवाबनवी, थरथराट, दे दणादण, चल रे लक्ष्या मुंबईला, हमाल दे धमाल, भुताचा भाऊ,बाळाचे बाप ब्रम्हचारी, धडाकेबाज,शेम टु शेम, अफलातून, बजरंगाची कमाल, आयत्या घरात घरोबा, झपाटलेला, अशी कितीतरी दर्जेदार चित्रपटांची नावे घेता येतील. हिंदी चित्रपट सृष्टीत मैनै प्यार कीया, साजन, बेटा, हम आपके है कौन, अनाडी चित्रपटातील भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. अभिनेते अशोक सराफ, महेश कोठारे, सचिन पिळगावकर, अशा कलाकारासमवेत त्यांची छान जोडी जमली. कॉमिक रोलसाठी लक्ष्मिकांत बेर्डे यांना फिल्मफेअर पुरस्कारासाठी चार नामांकने मिळाली. लक्ष्मिकांत बेर्डे यांचे आजही चित्रपट आवडीने पाहीले जातात.

सर्वांना हसवणारा लाडका लक्ष्या किडनीच्या आजारामुळे १६डिसेंबर २००४साली रसिकांना सोडून गेला.त्यांच्या निधनाने सर्वांनाच दुःख झाले. लोकांच्या मनात त्यांनी घर केले.चालता बोलता लक्ष्मिकांत बेर्डे यांनी हसवता हसवता सर्वांना सोडून जगाचा निरोप घेतला.आणि एका हास्यसम्राटाला आपण मुकलो आज त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन व मानाचा मुजरा!

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

# चाय की चर्चा



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**आज खास चहाविषयी विशेष लेख लिहिण्याचे कारण म्हणजे दरवर्षी 15 डिसेंबर रोजी आतंरराष्ट्रीय चहा दिवस साजरा केला जातो. बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, व्हिएतनाम, इंडोनेशिया, केनिया, मलावी, मलेशिया, युगांडा, भारत आणि टांझानिया यांसारख्या देशांमध्ये हा दिवस आंतरराष्ट्रीय चहा दिवस म्हणून ओळखला जातो.**

पाण्यानंतर चहा हे जगातील दुसरे सर्वाधिक वापरले जाणारे पेय आहे. 2007 मध्ये भारतीय चहा मंडळाने केलेल्या अभ्यासानुसार, भारतात उत्पादित होणाऱ्या एकूण चहापैकी सुमारे 80 टक्के चहा देशांतर्गत लोकच वापरतात. आता चहाची अशी वेगळी काय ती रेसिपी!!

साधी सोपी गोड तर असते ही चहा करण्याची पद्धत! तरी...."चहा सुद्धा येत नाही" अशी बिरूदं मिरवतात खूप जण! चहा पिणाऱ्यांच्या चवी ठरलेल्या असतात. खूप दूध,कमी साखर किंवा जास्त साखर, जास्त चहा पावडर.... असे ज्याचे त्याचे चहाचे कम्फर्ट झोन असतात. स्ट्रेस बस्टर म्हणून आवडता चहा मिळण्याच्या काही ठराविक जागा ही असतात....तिथे काही फार वेगळा चहा मिळतो म्हणून नाही..पण तिथे असणारी सोबत, मित्र मंडळी, सहकारी.., यामुळे तो चहा जास्त हवा हवासा वाटतो आणि पुढे ही कायम लक्षात राहतो!

कॉलेज मध्ये शिकत असतानाच सगळ्यात पहिली नोकरी होती एका सहकारी बँकेतली! .सकाळी कॉलेज.. दुपारी बँक! पार्ट टाइम आणि टेंपररी जॉब असल्यामुळे पगार नाममात्र! तर तिथे दुपारी चार वाजता गरम वाफाळता कडक चहा यायचा सगळ्या स्टाफ ला, पण त्या एक कटिंगचे पैसे आणि मिळणारा पगार याचं गणित काही जुळलं नाही...! घरून पैसे घेऊन मी तो पिऊ शकत होते लेकीन फिर वो मेरे उसुलोंके खिलाफ होता! म्हणजेच आपल्या आवडी निवडी आपल्या पैशावर पूर्ण करायच्या, घरच्यांच्या नाही हे माझं तत्व तेव्हापासूनच होतं. नंतर पुढे एका कॉर्पोरेट कंपनी मध्ये असताना, चोवीस तास मिळणारा ऑटोमॅटिक टी मेकर मधला अतिशय बेचव चहा मात्र नाईलाजामुळे खूप वेळा प्यायला जायचा. कामाच्या अनिश्चित वेळा, वेळी अवेळी असणारे लंच ब्रेक ..त्यामुळे चहा हाच एक पोटाला आधार होता.

घरचा चहा मात्र हक्काचा! त्या चवीत कणभर ही बदल होत नाही. चहा अगदी गोड मिट्ट हवा आणि दूध फक्त नावाला,कोरा चहा पिता येत नाही म्हणून जरासं दूध.. बस! भरपूर दूध किंवा दुधाचाच असलेला... म्हणजे सो कॉल्ड 'रिच' किंवा 'राजेशाही चहा चमचाभरही पिववत नाही. अर्थात तो चहा वाईट असतो असं मात्र अजिबात नाही हा! ज्यांना असा चहा आवडतो ते अगदी आवडीने असा फक्त दुधाचा चहा पितात. त्यामुळे पसंद अपनी अपनी... चाय अपनी अपनी, इतकंच! चहाबद्दल जितकं लिहू तितकं कमीच आहे. चहा झोप उडवणारा, उत्साह देणारा वगेरे वगेरे आहेच पण खरं तर एकटेपणाचा... प्रत्येक सुख दुःखाचा सोबती आहे तो असं म्हंटलं तर अतिशयोक्ती वाटेल पण आहे वस्तूस्थिती! चहाला पर्याय नाही हेच खरं! सध्याच्या चहामय हवेत हातात चहाचा कप घेऊन निवांत स्वतःशीच स्वतःचा स्वतः बरोबर जो संवाद सुरू असतो तेही एक प्रकारचे मेडिटेशनच आहे. आज आंतरराष्ट्रीय चहा दिवस! या निमित्ताने चहा बद्दल लिहिलेल्या ह्या काही ओळी!

*पुन्हा एक नवीन दिवस,*
*नवीन आव्हाने,*
*नवीन संघर्ष,*
*काही जुनेच बंध*
*आणि अनुबंध..*
*ह्या सगळ्या गर्दीत*
*अलगद वाट काढत*
*थोडा दमवत,*
*थोडा खुलवत*
*अखेर संपूनही जातो*
*हा नवीन दिवस!*
*ह्या प्रत्येक अशा दिवशी*
*रोज नव्याने जगायला,*
*एकच जिवलग गोष्ट*
*जी कायम अलवार*
*साथ देते ....*
*ती म्हणजे...*
*चहा*



# छत्रपती संभाजी राजेंचे राज्यकर्त्यांना पत्र

आधुनिक केसरी

**आजची बिघडलेली सामाजिक परिस्थिती पाहता आमच्यासारख्या शिवप्रेमींना अतोनात वेदना होत आहेत. सर्रास चाललेली गळचेपी पाहता याविरुद्ध आवाज उठविण्याचेही धाडस होत नाही. आणि म्हणूनच लेखणीचे शस्त्र घेऊन महाराजांची माफी मागून या पत्राद्वारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करीत आहे. या निमित्ताने का होईना आपण या लेखास प्रसिद्धी द्याल व त्यातून निश्चितच जनजागृती होईल अशी आशा.**

**प्रति,**
**वाचाळवीर**
**राज्यकर्ते व राजकारणी**
**हिंदवी स्वराज्य मुलुख**

मी छत्रपती संभाजीराजे शिवाजीराजे भोसले अतिशय खेदजनक अंतकरणाने तुम्हास निरोप धाडत आहे. आम्ही आणि आमच्या मर्द मावळ्यांनी रक्ताचे पाणी करून, बलिदान देऊन तुमच्यासाठी निर्मिलेल्या स्वराज्याची सध्याची वाताहत आता पाहवत नाही. यासाठीच का केला होता आम्ही अट्टाहास ? असे म्हणायची वेळ आता आली आहे. स्वराज्य म्हणजे काय ठाऊक आहे तुम्हास ? स्वराज्य म्हणजे काय तर आपले म्हणजेच स्वतःचे राज्य (आपल्या लोकांचे). स्वाभिमान जपणारे माझ्या रयतेचे राज्य. स्वकियांना न्याय मिळवून देणारे राज्य. स्व- संरक्षणासाठी सुसज्ज असणारे राज्य. आणि याच पवित्र अशा स्वराज्याची तुम्ही लोकांनी काय अवस्था करून ठेवली आहे. स्वराज्याचा अर्थच बदलून स्व-हिताचे, स्वार्थ साधण्याचे राज्य असाच काहीसा केला आहे. अठरा पगड आणि बारा बलुतेदार यांना घेवून निर्माण केलेल्या स्वराज्याची ही हेळसांड आता पाहवत नाही. जातीपाती काय, दंगली काय, विकलेला स्वाभिमान काय आणि शरमेने झुकलेल्या नाकर्त्या माना काय. जणूकाही पुन्हा एकदा मोघलाईचा उदय आपण सुरु करीत आहात. आता तर काय आमच्या आबासाहेबांच्या म्हणजेच साक्षात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा,पराक्रमाचा वरवरचा उदोउदो करताना तुम्ही इतके बेभान झाले आहात की आमच्या कर्तृत्वाचे अक्षरशः धिंडवडेच काढणे बाकी आहे. मला तुमच्यासारख्या भक्षकांच्या वक्तव्यांची तमा नाही. परंतु आबासाहेबांच्या कर्तुत्वाला कालबाह्य समजून नवे नकली अन स्वार्थी(राजकारणासाठी) आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असाल तर खबरदार . हे आम्ही सहन करून घेणार नाही. हा केवळ आमचाच नाही तर स्वराज्यासाठी रक्त सांडलेल्या तमाम वीर मावळ्यांचा अपमान आहे. राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या शिकवणीचा अपमान आहे. मूठभर लोकांचे गटतट करून त्यांना आपलेसे करून या स्वराज्याचे स्वामी समजण्याचा मूर्खपणा करू नका. रयतेचे राजे होणे तितके सोपे नाही. राजा सर्वसामान्य जनतेच्या हृदयातून जन्माला येत असतो, गोरगरिबांना उलथून नाही. आमच्या राज्यात आपलीमाणसेच काय दुश्मन गटातील गोरगरीबही उपाशी झोपले नाहीत. आज महागाईच्या गनिमीने लोक उपासमारीने किड्या मुंग्याप्रमाणे जीवन जगत आहेत. तुमच्यावर कोणाचे लक्ष नाही असे समजू नका. आजही या स्वराज्य दरबारी योग्य न्यायनिवाडा होऊ शकतो. कारण केवळ जयजयकार करून गप्प न बसता वेळप्रसंगी स्वाभिमानी बाण्याने तुम्हाला घायाळ करणारे कट्टर मावळे आजही या स्वराज्यात आहे याचे भान ठेवा. गाफील राहू नका, सत्तेच्या सारीपाटासाठी चाललेला हा विकृत डाव वेळीच थांबवा. अन्यथा राजकारणातून आणि या स्वराज्यातून तुमचा कडेलोट व्हायला वेळ लागणार नाही.



आबासाहेबांबद्दल आम्ही यापूर्वीही म्हटलंय
कलिकालभुजंगमावलीढं निखिलं धर्मवेक्ष्य
विक्लवं यः ।
जगतः पतिरंशतोवतापोः (तीर्णः)स
शिवछत्रपतिजयत्यजेयः ॥
अशा न भूतो न भविष्यती राजांच्या नावाला आणि कर्तुत्वाला गालबोट लावू नका.

इथुन पुढे स्वराज्याबद्दल आणि स्वराज्यकर्त्यांबद्दल एकही अपशब्द निघाला तर तुम्हाला मुलाहिजा मिळणार नाही. इतिहास घडविण्यात तुमचा वाटा नाही परंतु तो बिघडविण्यात आपली नसलेली अक्कल लावू नका. लोकांची माथी भडकवून त्यांचे आयुष्य मातीमोल करू नका. रयतेच्या इमानाशी आणि विश्वासाशी अजिबात दगाफटका नको. महापुरुषांबद्दल बोलताना तारतम्य बाळगा. जर आदराने त्यांच्यापुढे नतमस्तक व्हायचे नसेल तर स्वार्थासाठी त्यांचा जयजयकार करू नका. त्यांच्या नावाने विखार पेरण्यापेक्षा त्यांचे विचार पेरून सुराज्य साकार करा. माझे हे शब्द शिरसावंद्य समजा आणि शहाणे व्हा. जास्त काही सांगणार नाही. पुन्हा पत्र धाडणार नाही टकमक टोक अजूनही साबूत आहे लक्षात ठेवा. जय जिजाऊ जय शिवराय

**पत्रलेखन - सागर ननावरे, पुणे**

# श्री नवनाथ माहिती

आधुनिक केसरी

**श्री दत्त जंयती निमित्ताने आपण श्रीदत्त अवतारी श्रीगुरू बद्दल माहिती घेत आहे सर्वात प्रथम संत श्री गजानन महाराज शेगांव निवासी यांची आणि श्रीदत्त स्वरूपी श्री साईबाबा यांची माहिती पाहिली आज आपण श्रीनवनाथ यांच्या बद्दल माहिती घेऊ श्रीनवनाथ नावे:- मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ, हे नऊ नाथ आहेत.**



आधुनिक केसरी

नाथ संप्रदाय इतर नावे : योग संप्रदाय, सिद्ध संप्रदाय, अवधूत संप्रदाय, दर्शनी पंथ, गोरख पंथ, गोरखनाथी संप्रदाय, कानफाटा संप्रदाय, गुरू संप्रदाय नाथ संप्रदाय हा भारतातील एक शैव संप्रदाय आहे. "नाथ" या संज्ञेचा अर्थ रक्षणकर्ता अथवा स्वामी असा होतो. आदिनाथ म्हणजेच शिव वा महादेव यांच्यापासून या संप्रदायाचा उगम झाला म्हणून त्याला "नाथ संप्रदाय" असे नाव मिळाले, असे सांगण्यात येते. या संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर व्यक्ती आपल्या नावानंतर "नाथ" हा शब्द जोडता येतो. तांत्रिकदृष्टया दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांमध्ये भिन्नत्व असले तरी दोन्ही संप्रदायांकरिता पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध असल्याचे आढळते. मध्ययुगीन भारतामध्ये अनेक नव्या संप्रदायांचा उदय झाला. त्यापैकी नाथ संप्रदाय हा एक प्रमुख आणि महत्त्वाचा संप्रदाय होय. या संप्रदायाचा उद्‌गम नेमका कसा, कोठे आणि कधी झाला याविषयी अनेक संशोधकांनी विविध मते मांडली आहेत. त्याविषयी माहिती घेण्यापूर्वी नाथांच्या संप्रदायाची पाश्वभूमी पाहणे आवश्यक आहे. इसवी सनाच्या प्रारंभापासून नवव्या-दहाव्या शतकापर्यंतच्या सुमारे हजार वर्षांच्या काळात शैव, वैष्णव, बौद्ध, जैन असे अनेक संप्रदाय भारतामध्ये नांदत होते. पाचव्या शतकानंतरचा इतिहास पाहता असे दिसते की, शैवांच्या श्रीकुल आणि कालीकुल या दोन्ही शाखांमध्ये आणि बौद्धांच्या महायान पंथातून पुढे आलेल्या वज्रयान अथवा तंत्रयान परंपरेमध्ये अनेक वाममार्गी साधना पद्धतींचा अंतर्भावही हळूहळू होऊ लागला. श्रीशैल हे अशा तांत्रिक साधनांचे ख्यातकीर्त केंद्र असल्याचे रा. चिं. ढेरेंसारख्या अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. या पंथांमधूनच स्वतंत्र होत होत सिद्ध परंपरेचा जन्म झाला, ज्यामध्ये अशा तांत्रिक आणि वामाचारी उपासना पद्धतींना फाटा देऊन, बाह्याचारावर भर न देता तत्त्वानुभूती, भक्ती, योग इत्यादी साधनांवर भिस्त ठेवून मोक्षमार्गाची वाट चोखाळणारा सिद्ध संप्रदाय विकसित झाला. सिद्धांच्या या संप्रदायामध्ये जे दीक्षित असत, त्यांना मुख्यत्वेकरून 'नाथ' या विशेषणाने संबोधले जात असल्याचे आढळते. महाराष्ट्र-कर्नाटक-आंध्र प्रदेश हा प्रांत जरी या संप्रदायाची उदयभूमी मानला, तरी नाथ संप्रदायाचे अनुयायी संपूर्ण भारतभरातच नव्हे, तर भारताच्या आधुनिक सीमांच्या बाहेर असणाऱ्या प्रदेशातही पसरले होते असे म्हणावे लागेल. नाथांचे मूळ गुरू आदिनाथ म्हणजे शिव असून याचा दत्त संप्रदायाशी देखील अगदी निकटचा संबंध आहे. नाथ परंपरेप्रमाणे नवनाथांपैकी अनेकांना या संप्रदायाची दीक्षा दत्तात्रेयाकडून मिळाल्याचे दिसून येते. तांत्रिकदृष्टया जरी दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांमध्ये भिन्नत्व असले तरी दोन्ही संप्रदायांकरिता अत्यंत पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध असल्याचे आढळते. नाथांच्या परंपरेमध्ये अनेकदा हा संप्रदाय म्हणूनच नाथमत, अवधूतमत, अवधूत संप्रदाय, सिद्धमत इत्यादी नावांनी देखील ओळखला गेला आहे. नाथांची परंपरा नाथांच्या तीर्थक्षेत्रापैकी एक महत्त्वाचे स्थान – गोरखपूर येथील गोरखनाथ मंदिर नवनाथांना परंपरेने नवनारायणांचे अवतारस्वरूप मानण्यात येते. पुराणांमध्ये उल्लेख केलेल्या कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, अविहरेत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन या नऊ नारायणांनीच कलियुगामध्ये नवनाथांच्या रूपाने अवतार घेतला. नाथपरंपरेतील एका सांप्रदायिक श्लोकामध्ये नऊ नाथांची नावे पुढीलप्रमाणे सापडतात- गोरक्ष – जालंदर – चर्पटाश्च अडबंग – कानिफ – मच्छिन्दराद्यः। चौरंगी – रेवाणक – भत्रीसंज्ञा भूम्यां बभूवुर्नवनाथसिद्धाः।। मात्र या श्लोकामध्ये ग्रथित नसलेली अशी नागनाथ, गहिनीनाथ, शिवनाथ, मीननाथ, सत्यनाथ इत्यादी अनेक नावे नवनाथांपैकी असल्याचे नाथ परंपरेतील ग्रंथ सांगतात. नाथांच्या मूळ परंपरेत एकदा नऊ ही संख्या महत्त्वाची म्हणून रूढ झाल्यानंतर मग वेगवेगळ्या ग्रंथकाराने त्याला महत्त्वाचे वाटले ते नऊ नाथ नवनाथ म्हणून वर्णिले असावेत, एवढेच स्पष्टीकरण या नामभिन्नतेकरिता देणे शक्य आहे. ***क्रमशः***

# तू चाल पुढं

आधुनिक केसरी

**नसतेस जवळ तू जेव्हा जीव तुटका तुटका होतो जगण्याचे विरती धागे संसार फाटका होतो... संदीप खरे यांचं हे गीत ऐकलं आणि मन विचार करू लागलं कि खरंच स्त्री अभावी पुरुष एकाकी होतो आणि संसार नावाचा रथ त्याच्याच्याने ओढता ओढवत नाही. त्याची त्रेधा तिरपिट उडते. सगळ घर उदास वाटायला लागतं.पण याच्या नेमकं विरुद्ध विचार करायला गेलो तर आपल्याला काय दिसतं. काल आणि आजही समाजात असंख्य स्त्रिया या कोणत्या ना कोणत्या कारणाने तरुण वयात एकट्या राहत असतात.**

काहींचा जोडीदार अकाली जातो,काहींचा जोडीदार त्यांना अर्ध्या वाटेवर सोडून देतो. म्हणजेच त्यांच्या नशिबी परित्यक्ता स्त्रीचं जीवन येत.काही जणींना आयुष्यात पुरुषांकडून प्रेमाच्या नावाखाली फसवलं जातं तर कधी व्यसनी आणि मारहाण करणारा नवरा असतो. झालेल्या लेकरांची जबाबदारीही त्या स्त्रीवरच येते आणि मग तिचा एकटीचा संसार संघर्ष सुरू होतो. आपल्या आजू बाजूला अशा अनेक महिला आपल्याला दिसतील. ज्या पुरुष आणि स्त्री असे दोघांचेही कर्तव्य त्या एकट्याच निभावत असतात.त्यांच्या वाट्याला किती दुःख,
किती त्रास, किती कष्ट येत असतील याचा विचार तरी संसारात सुखी असणाऱ्या आणि नवरा मुठीत असणाऱ्या स्त्रिया करीत असतील का ? एखादी क्षुल्लक वस्तू लागत असली तरी नवऱ्याला फोन करून हे आणा असे फर्मान सोडणाऱ्या स्त्रियांना या एकट्या राहणाऱ्या स्त्रिया कशा स्वच्छंदी जीवन जगतात, कशी मजा करतात हेच फक्त दिसत असतं. पण त्यांनी डोळ्यातले अश्रू बाहेर येऊ नये म्हणून मनाला घातलेला बांध कधीच दिसत नसतो. एखादं काम बिघडलं तर नवऱ्याच्या नावाने शंख करणाऱ्या स्त्रियांना या एकट्या राहणाऱ्या महिलांचे हाल का दिसत नसतील.खरं तर या महिला त्यांच्या पुरुषाविना असणाऱ्या घराचं भक्कम छत होतात आणि संकटरुपी वादळ वारा अडवतात.
या महिला त्यांच्या घराचा कणखर उंबरा होतात आणि कित्येक वखवखलेल्या नजरा उंबऱ्यातच अडवतात. घरात माया,ममता करणारी ही महिला बाहेर मात्र कठोर पुरुषीपणाच्या आवरणात राहते. कारण तिला माहित असतं या जगात हिंस्र श्वापद पावलोपावली सावज शोधित असतात. एकटी असणारी स्त्री म्हणजे काहीना आयती संधी आहे अस वाटत असतं. दोन चार घटिका मनोरंजनाचे साधन म्हणून काही जण तिचा विचार करत असतात. तिच्या एकटेपणाचा, असहाय्यतेचा प्रसंगी गोड बोलून फायदा घेण्याचा देखील प्रयत्न नराधम प्रवृत्तीचे काही पुरुष करीत असतात. समाजामध्ये स्वतः व्हाईट कॉलर मध्ये वावरणारे हे राक्षसी चेहरे प्रत्यक्षात आतून मात्र खूप वेगळे असतात. याचा प्रत्यय देखील अशा गांजलेल्या महिलांना आलेला असतो.सहानुभूती आणि मदतीच्या नावाखाली आपली वासना शमविण्याचा प्रयत्न समाजातील असे हे लबाड लांडगे करीत असतात. यातून काही जणी वेळीच सावध होतात तर काही जणींचा हकनाक बळी देखील जातो.
पण त्याच वेळी ती कोणत्या संघर्षातून जातेय,तिला कोणत्या अडचणींना तोंड द्यावं लागतय याचा विचार करायला मात्र कोणीच तयार नसतं.
आलेल्या अनेक अनुभवातून मग ही स्त्री जाणती होते, शहाणी होते. मृगजळ कोणतं आणि वास्तव कोणतं यातला फरक तिला चांगलाच कळू लागतो. मग एकटी असताना जो काही भावनांचा कल्लोळ उठतो त्याची एकमेव साक्षीदार ही तीच असते.पण असे रडून कडून जीवन कडेला जाणार नाही हे मात्र तिला पक्कं ठाऊक असतं. म्हणूनच आपल्या लेकरांची जबाबदारी ती अगदी सक्षमपणे पार पाडते.



***म्हणूनच आयुष्याकडे मी***
***मागत नाही जादा***
***ठाऊक आहेत मजला माझ्या काय मर्यादा***

आपल्या काही मर्यादा आहेत हे तिला माहीत असतं. पण पुरुषांच्या सारखीच सगळी कर्तव्ये ती अचूकपणे पूर्ण करीत असते.एकटी दुकटी स्त्री ही किती तरी कर्तृत्ववान असते हे आपल्याला समाजात दिसत असते. व्यवहार, कुटुंब, बाजारपेठ अशा सगळ्या ठिकाणी ती लीलया वावरत असते आणि यातून आलेल्या अनुभवातून ती आणखी समर्थ होत असते. मनातली खंत व्यक्त न करता येणाऱ्या प्रत्येक क्षणाला ती आत्मविश्वासाने सामोरे जात असते.लोकांना ती दिसत असते एक कणखर आणि लढावू स्त्री,पण हिला ही एक मन आहे जे हळवे आहे याचा कोणी विचार करतो का ? उलट समाजात आपल्याला असं दिसतं कि स्त्री हिच स्त्रीची शत्रू असते. म्हणून तर पुरुष आणि स्त्री अशी दुहेरी भूमिका निभावणाऱ्या स्त्रियांना त्रास देऊन, दुषणं लावून त्या मोकळ्या होतात. जगाचा खरा चेहरा एकटया जगणाऱ्या महिलांनी अनुभवलेला असल्याने कोण कोणत्या भावनेने बोलतो हे त्या ओळखून असतात.चकाकणारे सोने नसते हे वास्तव त्यांनी पाहिलेले असते.म्हणूनच त्या त्यांच्या घराचा भक्कम कणा असतात.संसारात जोडीदाराची साथ असून ही जरा काही टेंशन झालं की आकांतांडव करणाऱ्यांनी कधी यांचा विचार करून पाहावा कि यांनी कुणावर ओरडावे ? आपली दुःख उरात दाबून पुरुषी स्वभावाचं पांघरून वापरून या महिला आपल्या लेकरांचा भक्कम आधार होतात.म्हणूनच यांना म्हणावंसं वाटतं कि - तू चाल पुढं...

सुजाता पुरी
संपर्क क्र. 8421426337

# चीन ईशान्येत सतत दबाव का वाढवत आहे .?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दोन वर्षांपूर्वी गलवान खोऱ्यात झालेल्या हिंसक संघर्षानंतर चीनने आता ईशान्येकडील अरुणाचल प्रदेशासह तिबेट सीमेवर लक्ष केंद्रित करून सीमावर्ती भागात आपल्या कारवाया तीव्र केल्या आहेत. यापूर्वी चीनकडून सीमाभागातील रस्ते, रेल्वे मार्ग, गावे आणि इतर पायाभूत सुविधांशी संबंधित मोठ्या प्रकल्पांच्या बातम्या अनेकदा समोर आल्या आहेत. अलीकडच्या काळात या सीमेवर अशा प्रकारच्या हिंसक संघर्षाची ही पहिलीच घटना आहे . याच्या काही महिन्यांपूर्वी तवांग सेक्टरमध्ये चिनी लष्कराचे सुमारे दोनशे सैनिक भारतीय हद्दीत घुसले होते. तिथल्या भारतीय जवानांशी त्यांची बाचाबाचीही झाली. नंतर स्थानिक कमांडरच्या पातळीवर प्रकरण मिटवण्यात आले आणि चिनी जवानांना परत पाठवण्यात आले.**

चीनने सीमेपासून २० किलोमीटरच्या परिघात मोठ्या प्रमाणावर बांधकाम केले आहे. तिबेटची राजधानी ल्हासा येथून जवळच्या सीमेपर्यंत नवीन हाय-स्पीड ट्रेनही सुरू झाली आहे. अलीकडेच अशा बातम्याही समोर आल्या होत्या की, चीन भारतीय सीमेतील एका गावात स्थायिक झाला आहे. सॅटेलाइट फोटोंद्वारे याची पुष्टी झाली आहे. या भागात चिनी लष्कराच्या वाढत्या कारवायांमुळे स्थानिक लोक चिंतीत झाले आहेत. या भागात चीनकडून नियंत्रण रेषेजवळ वेगाने रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांच्या बांधकामाची कामे केली जात आहेत.

चीन गेल्या काही वर्षांपासून सीमेवर सातत्याने पायाभूत सुविधा मजबूत करत आहे. सीमेच्या २०किलोमीटर परिसरात त्यांनी मोठ्या प्रमाणावर बांधकामे केली आहेत. हवाई, रेल्वे आणि रस्त्यांचे जाळे विस्तारण्याबरोबरच त्यांनी तिबेटमध्ये बुलेट ट्रेनही सुरू केली आहे. ही ट्रेन अरुणाचल प्रदेशातील निंगची या सीमावर्ती शहरात जाते. वास्तविक नियंत्रण रेषेवरील ३,४८८किमी लांबीच्या क्षेत्रावर भारत आणि चीन यांच्यात सीमा विवाद आहे.

अरुणाचलचे स्थानिक नेते सातत्याने चीनवर नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत घुसल्याचा आरोप करत आहेत. यापूर्वी चिनी सैन्याने पाच भारतीय तरुणांचे अपहरणही केले होते. १२ दिवसांच्या राजनैतिक पातळीवरील चर्चेनंतर त्यांची सुटका करण्यात आली. सरकारी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, गेल्या वर्षभरात चिनी सैनिकांनी सीमा ओलांडल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. परंतु तो भाग इतका दुर्गम आहे की सर्वत्र सैन्य तैनात करणे शक्य नाही आणि माहितीही उशिराने राजधानीपर्यंत पोहोचते. काही महिन्यांपूर्वी, अरुणाचल प्रदेशच्या सीमावर्ती भागात राहणाऱ्या भारतीय तरुणांना चिनी सैन्यात भरती करण्याचा प्रयत्न करत असल्याच्या बातम्याही आल्या होत्या.

त्यानंतर मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामाला गती देण्याची विनंती केंद्राला केली होती जेणेकरून बेरोजगारी आणि कनेक्टिव्हिटीसारख्या समस्यांना आळा बसेल.

**तवांगचे महत्त्व**

शेवटी अरुणाचल प्रदेशात आणि विशेषतः तवांग भागात चीनच्या वाढत्या कारवाया कशामुळे? चीन संपूर्ण अरुणाचल हा दक्षिण तिबेटचा भाग मानत असला तरी तवांगला सामरिक महत्त्व आहे. तवांग हा अरुणाचल प्रदेशातील सर्वात पश्चिमेकडील जिल्हा आहे, जो राजधानी इटानगरपासून सुमारे ४५० किमी अंतरावर आहे. तिबेट आणि भूतानशी तिची सीमा आहे. तवांगमध्ये तिबेटची राजधानी ल्हासा नंतर जगातील दुसरा सर्वात मोठा तिबेटीयन बौद्ध मठ आहे. तिबेटी बौद्ध केंद्राचे हे शेवटचे सर्वात मोठे केंद्र चीनला अनेक दिवसांपासून नष्ट करायचे होते. १९६२ च्या भारत-चीन युद्धादरम्यान तवांग हे लढाईचे केंद्र होते.

माजी परराष्ट्र सचिव शिवशंकर मेनन यांनी त्यांच्या



'चॉईसेस इनसाइड द मेकिंग ऑफ इंडियाज फॉरेन पॉलिसी' या पुस्तकात म्हटले आहे की, बीजिंगने हे स्पष्ट केले आहे की त्यांना तवांग हवे आहे. मात्र, बीजिंगच्या या मागणीला भारत सरकार सातत्याने विरोध करत आहे.

अरुणाचल प्रदेशचा काही भाग तिबेट म्हणून चीनचा दावा आहे. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात चीनने अरुणाचल प्रदेशातील १५ ठिकाणांची चिनी, तिबेटी आणि रोमन भाषेत नावे दिली होती. त्यानंतर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने त्यांच्या निर्णयावर तीव्र आक्षेप व्यक्त केला होता आणि अरुणाचल प्रदेश हा नेहमीच भारताचा अविभाज्य भाग आहे आणि यापुढेही राहील असे म्हटले होते. वास्तविक, १९१२पर्यंत तिबेट आणि भारत यांच्यात कोणतीही स्पष्ट सीमारेषा आखलेली नव्हती. या भागांवर मुघल किंवा ब्रिटिश शासकांचे नियंत्रण नव्हते. तवांगमध्ये बौद्ध मंदिर सापडल्यानंतर सीमारेषेचे मूल्यांकन सुरू झाले. अरुणाचल प्रदेशचे भाजप खासदार तापीर गाओ यांनी असा युक्तिवाद केला की ही समस्या केंद्रातील माजी काँग्रेस सरकारची निर्मिती आहे. ऐंशीच्या दशकापासून चीन सीमावर्ती भागात रस्ते बांधत आहे. राजीव गांधी सरकारच्या कार्यकाळात तवांगमधील सुमदोरोंग चू खोऱ्यावर चीनने ताबा मिळवला होता. हद्दीपर्यंत रस्त्याच्या बांधकामाकडे शासनाने लक्ष दिले नाही. परिणामी, तीन ते चार किलोमीटरचा भाग बफर झोन बनला, जो नंतर चीनच्या ताब्यात गेला. या भागात, जिथे भारत मॅकमोहन रेषेला सीमा मानतो, तिथे चीन वास्तविक नियंत्रण रेषा (LAC) मानतो. भाजप खासदार गाओ म्हणतात, "या समस्येवर एकमेव आणि कायमस्वरूपी उपाय म्हणजे राज्याची सीमा अचूकपणे चिन्हांकित करणे." धोरणात्मक तज्ज्ञ जीवन दासगुप्ता म्हणतात, "केंद्र सरकारने ही समस्या गांभीर्याने घेतली पाहिजे आणि त्याच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी ठोस पुढाकार घ्यावा जेणेकरून चीनच्या योजनांना वेळेत सामोरे जावे लागेल. यासोबतच सीमाभागात विकास आणि पायाभूत सुविधांचे प्रकल्पही लवकर राबविण्याची गरज आहे.

**भारत सरकारचे प्रयत्न**

सीमेवर चीनच्या वाढत्या सक्रियतेला तोंड देण्यासाठी भारत सरकार अरुणाचल प्रदेशातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यात व्यस्त आहे. यामध्ये नवीन रस्ते, पूल, हेलिकॉप्टर तळ आणि दारुगोळ्यासाठी भूमिगत साठवण तळ बांधणे, सीमावर्ती भागात सर्व हवामान प्रवेश प्रदान करणारे नवीन बोगदे यांचा समावेश आहे.अरुणाचल प्रदेशमध्ये भारत सरकारने पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे. लष्कराचे म्हणणे आहे की, डोंगराळ प्रदेश आणि जंगलामुळे पाळत ठेवणे आणि ठावठिकाणाकडे बारकाईने लक्ष ठेवणे कठीण जाते. म्हणूनच LAC च्या बाजूने पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर विकसित केल्या जात आहेत. सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या या सरावांतर्गत भारतीय लष्कराने चीन सीमेजवळ अरुणाचल प्रदेशात एक 'मॉडेल व्हिलेज'ही उभारले आहे. अरुणाचल प्रदेशातील अंजाव जिल्ह्यातील चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील काहो हे भारतातील शेवटचे गाव लष्कराने 'मॉडेल व्हिलेज' म्हणून विकसित केले आहे. या गावात सध्या ७९ लोक राहतात. या भागातील मुलभूत प्रकल्पांसाठी शासनाने यावर्षी २४९.१२ कोटींची तरतूद केली आहे, तर मागील वर्षी ही रक्कम केवळ ४२.८७ कोटी होती. चीनच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी सीमा भागात तैनात लष्कराच्या जवानांची संख्या वाढवण्याबरोबरच बोफोर्ससारख्या आधुनिक तोफगोळ्याही तैनात करण्यात आल्या आहेत. यासह, अत्यंत महत्त्वाचा 700 कोटी रुपयांचा सेला बोगदा प्रकल्प पुढील वर्षीच्या प्रस्तावित मुदतीपूर्वी जूनमध्येच पूर्ण होणार आहे. त्यामुळे तवांग आणि त्याच्या लगतच्या सीमाभागात वर्षाचे बारा महिने अनिर्बंध वाहतूक शक्य होणार आहे. सध्या सेला पास हिवाळ्यात जोरदार बर्फवृष्टी आणि खराब हवामानामुळे बंद आहे. त्यामुळे सीमावर्ती भागात लष्करी उपकरणे पोहोचवण्यासाठी लागणारा वेळ वाचेल. पारंपारिकपणे, लडाखमधील ८३२ किमी लांबीच्या LAC चे निरीक्षण १४ व्या कॉर्प्सच्या एका विभागाद्वारे केले जाते. परंतु पूर्व कमांडमधील १,३४६ किमी लांबीच्या LAC चे रक्षण करण्याची जबाबदारी या प्रदेशातील दोन कॉर्प्सच्या सहा विभागांवर सोपवण्यात आली आहे.

यासोबतच, चिनी कारवायांचा सामना करण्यासाठी, भारतीय सैन्य तिबेटोलॉजीमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) तैनात असलेल्या आपल्या सैनिकांना आणि अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देत आहे जेणेकरून त्यांना तिबेटी संस्कृती, लोक, राहणीमान आणि समाजाची अधिक चांगली माहिती मिळू शकेल. यासाठी देशभरातील सात संस्थांची निवड करण्यात आली आहे. यातील एक सिक्कीम आणि दुसरा अरुणाचल प्रदेशात आहे. ही दोन्ही राज्ये तिबेटच्या सीमेला लागून आहेत. सीमेच्या दोन्ही बाजूला तिबेटी लोकसंख्या मोठी आहे.

# ‘मस्तानी’

आधुनिक केसरी

**मस्तानीचे व्यक्तिमत्त्व नेमके कसे होते? ती कायम गैरसमजांच्या झाकोळाखाली का राहिली? बाजीरावांचे असामान्यत्व या ना त्या कारणाने सिद्ध होत राहील. परंतु मस्तानीचे काय? मस्तानीबद्दल तिरस्कार मात्र तिच्या मृत्यूनंतरही संपला नाही. ‘श्रीमंत पेशवे बाजीराव-मस्तानी’ या ‘ई टी. व्ही. मराठी’ वरील मालिकेतून सध्या तिच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला गेला. मस्तानीच्या अगम्य व्यक्तिरेखेचे रहस्य उलगडण्यासाठी या मालिकेच्या लेखकाने सखोल संशोधन केले आहे. या लेखकाचा, मस्तानीचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवणारा लेख-**



‘मस्तानी’ हे इतिहासातील एक जरतारी, परंतु बदनामीची किनार लाभलेले एक अद्‌भुत रहस्य. ते अजून इतिहासकारांना आव्हान देत आहे. मस्तानी एक बुंदेल स्त्री, जी बाजीराव पेशवे यांच्यासोबत पुण्यात आली आणि बाजीरावांच्या मृत्यूनंतर त्या धक्क्याने हे जग सोडून गेली. मूर्तिमंत निष्ठेची भाषा ती समस्त मराठी मुलुखाला शिकवून गेली. १७४० साली झालेल्या या घटनेला आज ३०० वर्षे होत आलीत आणि तरीही ती मराठी साहित्यात, मराठी मनात वारंवार तिच्या व्यक्तिमत्त्वाचे उल्लेख येतात. परंतु तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्काराला कायम थट्टेचा, टिंगल-टवाळीचा उपसर्ग पोहोचला आणि तो अबाधित राहिला, म्हणूनच आजही या ३०० वर्षांत महाराष्ट्रातील एकाही घरात, एकाही नवजात बालिकेचे नाव ‘मस्तानी’ असे ठेवलेले आढळून आले नाही. मस्तानी हे नाव कुटुंबापेक्षा बाजारातच जास्त दिसले. चटपटीत पदार्थांना ठसठशीतपणा आणण्यासाठी या नावाचा उपयोग झाला. म्हणजे मस्तानी भेळ, मस्तानी मिसळ, मस्तानी कुल्फी, मस्तानी उदबत्ती.. मस्तानीच्या नावाची विरूपता झाली, ती अशी. मस्तानीची दुसरी ओळख आहे, ती म्हणजे रखेल मस्तानी, नाची मस्तानी, कंचन मस्तानी आणि तिची शेवटची ओळख म्हणजे तिने पान खाल्ल्यानंतर पानाची पिंक तिच्या गळ्यातून खाली उतरताना दिसायची व ती पान खाऊन सज्जात बसायची त्याला लोक ‘मस्तानीचा सज्जा’ म्हणून ओळखत. मस्तानी या पद्धतीने इतिहासपटलावर प्रतीत झाली. परंतु खरंच मस्तानी अशी होती का ? काय आहे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे रहस्य ? मस्तानीला समजून घ्यायचे असेल तर प्रथम आपल्याला छत्रसाल महाराजांना समजून घ्यावे लागेल. राजा छत्रसाल महाराज हे प्रौढप्रतापी, सहिष्णू, आनंदधर्म उद्‌गाते, बुंदेल खंडाचे भाग्यविधाते. आजही बुंदेल खंडात परमेश्वराअगोदर त्यांची पूजा केली जाते. ‘छत्रसाल महाबली! कर दे भली! कर दे भली!’ अशी प्रार्थना म्हणून त्यांचा आशीर्वाद घेतला जातो. एवढे मोठेपण हिंदुस्थानातील कोणत्याही राजाला लाभले नाही. छत्रसाल महाराज हे प्रणामी पंथाचे होते. प्रगत, उदारमतवादी प्रणामी पंथात हिंदू-मुस्लीम या धार्मिक भेदास मान्यता नव्हती. वेद आणि कुराण यातील ईश्वर एकच असून, मनुष्यमात्राची समानता, धार्मिक सहिष्णुता आणि निरामय प्रेमभावना ही या पंथाची तत्त्वे होती. या प्रणामी पंथास निगडित असलेली खूप मोठी मोठी नावे आहेत. त्यातील एक नाव म्हणजे महात्मा गांधी यांचे. ते व त्यांचे कुटुंब हे प्रणामी पंथीय होते. हे ऐकले तर आश्चर्य वाटेल; परंतु हे सत्य आहे. अशा पंथातून, अशा संस्कारातून मस्तानी आली होती. ती छत्रसाल महाराजांना यवन उपपत्नीपासून झाली होती. प्रणामी पंथाच्या तत्त्वाप्रमाणे हिंदू-मुस्लीम भेद हा तर ग्राह्य धरत नसत. त्यामुळे मस्तानी ही छत्रसालांची औरस राजकन्याच ठरते. तिचे शिक्षण, संगोपन, तिच्यावरचे धार्मिक, सामाजिक संस्कार हे छत्रसालानेच केले होते. म्हणूनच ती नृत्य, गायन, तलवार, तिरंदाजी यात प्रवीण होती. त्याचबरोबर संत कबीर, मीरा, मस्ताना, केशवदास तुलसीदास हे संत तिला मुखोद्‌गत होते. **क्रमशः**

प्रताप गंगावणे

# 'मोतीबागे'च्या सहवासातील लख्ख आठवणी...

आधुनिक केसरी

जनकल्याण समितीचं पंजीकरण झालं ती बैठक मला आठवते. त्याला मा. मोरोपंत पिंगळे आले होते. अगदी छोटं असलेलं काम, एका छोट्या खोलीत सुरू झालेलं हे काम आता प्रांतभर झालेलं आहे.

मा. बाळासाहेब देवरस, रज्जूभय्या, सुदर्शनजी या परमपूजनीय सरसंघचालकांचं वास्तव्य मोतीबागेत झालेलं आहे. त्या दृष्टीनं म्हणता येईल की, सरसंघचालकांच्या वास्तव्यानं पुनीत झालेलं असं ते ठिकाण आहे. ती एक स्मृती आणि त्यांच्याबरोबर झालेल्या बैठकी, संवाद हेही निश्चितपणे त्या वास्तूनं पाहिलेले आहेत.

मोतीबाग हे संघाचं प्रमुख केंद्र म्हणून विकसित होण्यात अनेक पिढ्या खपलेल्या असल्या पाहिजेत. कार्यालय हे व्यवस्थेचं स्थान नसून संघटनासूत्र राबविणारं किंवा रुजविणारं स्थान आहे, असं विधान मी आता करू शकतो. तेव्हा काय होतं, ते समजत नव्हतं; पण कार्यालय म्हणजे तिथे सारखं काही ना काही तरी घडतंय. विचार मिळतोय, संघटनासूत्र बांधलं जातंय. माणसं निर्माण होतायंत, असं सतत होत असतं. आता तर म्हणता येईल नां, सत्तर वर्षं झाली. सत्तर वर्षांत किती पिढ्या गेल्या असतील. बारा वर्षांची एक पिढी म्हटली तर सहा पिढ्या गेल्या. आणि तो प्रवाह जो मला जाणवतोय, तो आजही अखंड चालूच आहे. किंबहुना तो विस्तारतोय, वेगवेगळ्या प्रकारांनी. वेगवेगळ्या कामांनी.

वास्तू हे निमित्त. पण तिथे चालणाऱ्या गतिविधी, संवाद, विचारप्रसार, संघटन बांधणं, अनौपचारिक चालणारी एकत्रिकरणं, गप्पागोष्टी... या सगळ्यातून जे आपण म्हणतो की, संघकामामध्ये स्वयंसेवकाची जडणघडण होत राहते, ते मुख्यतः जाणवतं. कार्यालय ही नितांत आवश्यक गोष्ट आहे. अनेक स्मृती त्याच्याशी जोडल्या जातात. अनेक घटनांची साक्ष मिळते. त्यामुळे ते एक नुसतं स्मरणरंजन न होता तो एक संस्काराचा भाग होतो. संघाच्या प्रत्येक टप्प्यावरील विकासाची साक्ष या वास्तूतून मिळते ती अशी.

**(राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. अशोकराव कुकडे यांनी सांगितलेल्या आठवणींचे शब्दांकन.)**



# शिरेगाव सोसायटीत पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व

## अंबादास गोटे व दादासाहेब तायडे यांच्या रणनितीने सर्वच सदस्य विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथून जवळच असलेल्या शिरेगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, शिरेगाव निवडणुकीत महंत लक्ष्मणदास बाबा शिरेश्वर शेतकरी विकास पॅनलचे सत्तेत असलेल्या गटाचे पुन्हा निर्विवाद वर्चस्व राहिले.

उद्धव ठाकरे शिवसेना गंगापूर तालुका प्रमुख दिनेश मुथा यांच्या पत्नी प्रिया दिनेश मुथा व प्रा.नंदकुमार कुकलारे रिंगणात असल्याने ही निवडणूक अधिकच चुरशीची झाली .

यामध्ये प्रा. नंदकुमार कुकलारे व प्रिया दिनेश मुथा यांच्यासह महंत लक्ष्मण दास बाबा शिरेश्वर ग्रामविकास पॅनलचे अंबादास गोटे व दादासाहेब तायडे यांच्या रननीतीने सर्वच सदस्य 100 ते 125 मतांची आघाडी घेत विजयी झालेले आहेत. तर दोन संचालकांची यापूर्वीच बिन विरोध निवड झालेली आहे.

प्रा. नंदकुमार कुकलारे यांनी 286 मते घेऊन गंगापूर सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक नानासाहेब गायके यांचा 176 मतांनी पराभव करत राजकीय कारकीर्दची सुरुवात केली. या निवडणुकीत अंबादास शंकर गोटे, दिगंबर गोटे, बाबुलाल गुरे, ज्ञानेश्वर तायडे, अशोक तायडे, कैलास तायडे, भगीरथाबाई क-हाळे, सौ. अरुणाबाई अहिरे, सौ. संगीता चिंधे इत्यादी संचालकांनी निवड झालेली आहे. सर्व विजयी उमेदवाराचे शिरेगाव, देवळी, सुलतानाबाद व महमंदपूर च्या ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.



# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या राज्य कार्यकारिणी मंडळावर प्रा.डॉ. संजय पाटील



आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या तिसावे राज्य अधिवेशन लातूर येथे दि 9 व 10 डिसेंबर 2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात संपन्न झाले. त्या दरम्यान नवीन कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली. या निवडीमध्ये महाराष्ट्रातील नामवंत, तज्ञ व इतिहास संशोधन क्षेत्रात आपले योगदान देणाऱ्या प्राध्यापकांची, इतिहास संशोधक व इतिहास प्रेमींची निवड केली जाते. प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील यांचे संशोधन लक्षात घेता त्यांची त्रैवार्षिक निवड कार्यकारणी सदस्य पदावर करण्यात आलेली आहे.

याप्रसंगी अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे मावळते अध्यक्ष प्रा डॉ सतीश कदम,नूतन राज्याध्यक्ष डॉ अरुणा मोरे,उपाध्यक्ष डॉ शिवराज बोकडे,सल्लागार प्रा डॉ सर्जेराव भामरे, प्रा डॉ बी डी कुलकर्णी, प्रा डॉ सोमनाथ रोडे, डॉ नामदेवराव गरड,डॉ जी बी शहा,प्राचार्य डॉ भि ना पाटील,प्रा डॉ ग का माने,डॉ चंद्रकांत चव्हाण तसेच डॉ संजय शिंगाने, धरणगाव, डॉ सुनील पाटील,शहादा,डॉ विलास पाटील,नंदुरबार आदींच्या उपस्थितीत त्यांची निवड जाहीर करण्यात आली.याप्रसंगी खानदेशातील उपस्थित सर्व प्राध्यापकांनी त्यांची एकमताने शिफारस केल्याने बिनविरोध निवड जाहीर केली. सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे व कौतुक होत आहे. या निवडीबद्दल ग्राम विकास मंडळ नवलनगरचे अध्यक्ष माननीय विजय नाना पाटील( माजी केंद्रिय मंत्री )यांनी कौतुक केले आणि नवलनगर येथील क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालयातील प्राचार्य,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# एसएनडीटी'च्या सिनेट निवडणुकीत रावी मोरे विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ, मुंबईच्या पदवीधर मतदारसंघाच्या सिनेट निवडणुकीत एईव्हीपीएम वूमन्स कॉलेजच्या रावी राजेंद्र मोरे हिने खुल्या प्रवर्गातून विजय मिळविला. त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यापीठ विकास मंच तर्फे ही निवडणूक लढवली होती. विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघात १० पैकी ७ जागांसाठी मतदान झाले. यात औरंगाबादच्या एईव्हीपीएम वूमन्स कॉलेजच्या रावी मोरे खुल्या प्रवर्गातून निवडणुकीच्या आखाड्यात उतरल्या होत्या. खुल्या प्रवर्गातून औरंगाबादेतील रावी राजेंद्र मोरे, सांगलीतील रुक्साना फिरोज मुलाणी, सुवर्णा जगदीश झाडबुके, वर्षा गोरखनाथ सुखदेव हे चार उमेदवार निवडून आले. महिला



प्रवर्गातून सांगलीतील मोनिका राहुल मांगलेकर, अनुसूचित जाती प्रवर्गातून मुंबईतील अर्चिष्मती अशोक मनस्विता सोनवणे निवडून आल्या. सात पैकी सहा उमेदवार विजयी झाल्याने या निवडणुकीत विद्यापीठ विकास मंचचे वर्चस्व राहिले. ओबीसी प्रवर्गातून विद्या सुहास कोळी (सांगली)या बिनविरोध निवडून आल्या. एसटी व एनटी प्रवर्गातील जागा उमेदवार नसल्याने रिक्त राहिल्या आहेत. रावी मोरे हिच्या विजयाबद्दल शहरातील एसएनडीटी विद्यापीठाशी संलग्नित एईव्हीपीएम वूमन्स कॉलेजचे संचालक पंकज भारसाखळे, संचालिका डॉ. केजल भारसाखळे, प्राचार्य डॉ.मिलिंद उबाळे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकवृंदानी अभिनंदन केले.

# राहुल रॉय मुळे यांनी विद्यार्थ्यांना वाटले रीडिंग टेबल्स कार्ड

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील सर्व विद्यालयात मार्गदर्शन करण्यात आले ध्येयाने वेडी झालेली माणसं इतिहास घडवीत असतात , असाच एक ध्येयवेडा तरुण आपले गॅरेज दुकान चालवून येणाऱ्या दैनंदिन मिळकतीतून समाजाचे आपण एक देणं लागतो या कृतार्थ भावनेतून वेळोवेळी सामाजिक कार्य करीत असतो या तरुणाचे नाव आहे राहुल रॉय मुळे. विद्यार्थ्यांचे पाढे पाठ व्हावेत यासाठी त्यांनी पदरमोड करून स्वखर्चाने पाढ्यांचे रीडिंग कार्ड्स तयार करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा ध्यास त्यांनी घेतला आहे. तालुक्यातील प्रत्येक शाळेत पोहोचण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला असून आज पहूर येथील डॉ. हेडगेवार प्राथमिक विद्यालय आणि सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात त्यांनी सदर कार्डचे विद्यार्थ्यांना वाटप केले. त्यांच्या या शैक्षणिक कार्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



# पूनम पवार यांच्या निधीतून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या गुत्तेदाराची चौकशी करा : नरेंद्र रेड्डी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** मांजरम गटाचे जिल्हा परिषद सदस्य पूनमाताई पवार यांनी आपल्या मतदार संघाला बाजूला सारत धर्माबाद तालुक्यातील पिंपळगाव ते सालेगाव या दरम्यानच्या रस्त्याचे मजबूतीकरणाचे काम केले.या कामाचे विद्यमान आमदार राजेश यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा वाजत - गाजत पार पडला होता. मात्र ह्या कामाचा दर्जा इतका सुमार आहे की, एक वर्षातच रस्ता उखडून जाण्यास सुरवात झाली.त्यामुळे त्या गुत्तेदाराची चौकशी करावी अशी मागणी होत आहे. जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत इतर जिल्हा रस्ते विकास व मजबूतीकरण सन २०२० - २०२१ अंतर्गत कारेगाव - पिंपळगाव रस्त्याची सुधारणा करणे यासाठी मांजरम गटाचे जिल्हा परिषद सदस्य पूनमाताई पवार यांनी प्रयत्न करून निधी मंजूर करून घेतला हे खरे, त्यांनी आपल्या तालुक्याऐवजी, मतदारसंघाऐवजी धर्माबाद तालुक्यात निधी आणला हे बरेच झाले. ह्या रस्त्याच्या भूमिपूजनासाठी एक आमदार व एक कामदार दोघेही उपस्थित होते हे ही बरेच झाले.पण प्रश्न आहे तो त्यांनी निवडलेल्या गुत्तेदाराच्या कामाच्या दर्जाचा आहे. ज्या गुत्तेदारांनी ह्या रस्त्याचे काम केले आहे.त्यांनी इतके थातूर - मातुर काम केले आहे की, एक वर्षातच रस्त्यावरची गिट्टी, डांबर उडून जाऊन खड्डे पडत आहेत.त्यामुळे कामदार व आमदारांनी लोकांना चांगला रस्ता मिळावा म्हणून हा निधी मंजूर करून घेतला होता की, आपल्या कार्यकर्त्यांना कामातून पैसा मिळवून देण्यासाठी हा रस्ता बनविला होता? गुत्तेदारांना काम देताना त्यांचा या क्षेत्रातील अनुभव लक्षात घेतला होता का? त्यांच्याकडे रस्त्याच्या कामासाठी लागणारा तज्ञ व कुशल मनुष्यबळ होते का? आधुनिक यंत्राचा या कामासाठी वापर करण्यात आला का? डांबर, गिट्टी व अन्य मटेरियलची मात्रा निकषा प्रमाणे वापरण्यात आली होती का? मुख्य म्हणजे आमदार व कामदारांचे हे काम चालू असताना लक्ष होते का? ते अन्य गुत्तेदाराना ज्या पद्धतीने सुचना देतात तशा सूचना यांना देण्यात आल्या होत्या का? जर हे निकृष्ट दर्जाचे काम झाले आहे हे दिसत असेल तर यक विरोधात ते तक्रार करणार आहेत का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. खरे म्हणजे ज्या गुत्तेदारांनी हे काम केले आहे त्यांची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी नरेंद्र रेड्डी यांनी केली आहे.वेळ पडल्यास त्यांचा आम्ही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करू असे ते म्हणाले.







खर म्हणजे जिल्हा परिषदेचा पैसा हा लोकांचा पैसा असतो .त्यातून विकासकामावर जो खर्च होतो .त्यांची गुणवत्ता जोपासली पाहिजे .मात्र या रस्त्याचा निधी रस्त्यावर कमी खर्च झाला असून खिशात जास्त गेला आहे .त्यामुळे या कामाची चौकशी झाली पाहिजे .कोणी आमदारांच्या जवळचा आहे म्हणून पाठीशी घालू नये .

**– मोहन भंडरवाड**
**सरपंच, पिंपळगाव**

# चुकीच्या पद्धतीने होतेय पुलाचे बांधकाम

## शेतीचे होणार नुकसान; शेतकऱ्यांनी केली चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** नारवट, ता. (भोकर) येथील पादंण रस्त्यावर नव्याने बांधण्यात येणाऱ्या पूलाचे काम चूकीच्या पध्दतीने केले जात आहे. भविष्यात लगत असलेल्या शेतीत पाणी घुसणार असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. संबंधित अधिकारी आणिकंत्राटदारांनी त्वरीत कामात सूधारणा करून दिलासा द्यावा अशी मागणी शेख अप्सर शेख हुसेन यांनी केली आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नारवट शिवारात पांदण रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. रस्त्यामूळे येथील शेतीला जाण्यासाठी सोयीचे होणार आहे हि बाब शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आहे. येथील गट क्रमांक(दोन) लगत असलेल्या नाल्यावर नव्याने पूलाचे बांधकाम करण्यात येत आहे. पुलावर टाकण्यात येणारे सिमेंट पाईपची दिशा शेतीच्या बाजूने करण्यात आली आहे. चूकीच्या पध्दतीने काम होत असल्याने भविष्यात सदरील शेतात पाणी घुसण्याची दाट शक्यता. होणा-या नुकसानीस आपण जबाबदार असणार असा आरोप निवेदनात केला आहे. मागील अनेक वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीउत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होत आहे.त्यामुळे शेतक-यावर ऊपासमारीची वेळ आली आहे. एकीकडे निसर्ग आणि आता बांधकाम विभागाकडून नाहक त्रास देणं सुरू आहे.संबधीतानी घटणास्थळी प्रत्येक्ष भेट देऊन पंचनामा करावा. कंत्राटदार आणि बांधकाम विभागांनी याकडे त्वरीत लक्ष देवून शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पूढाकार घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा आपल्या कार्यालयासमोर उपोषण करण्याचा ईशारा शेख अप्सर यांनी निवेदनात दिला आहे.

# समृद्धी महामार्गावर कारला भीषण आग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** समृद्धी महामार्गावर एका चारचाकी कारला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे. मात्र सुदैवाने यात कार चालक आणि प्रवासी सुरक्षित असून कोणतेही जीवितहानी झालेली नाही. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते 11 डिसेंबरला समृद्धी महामार्गाच्या नागपूर-शिर्डी या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण सोहळा पार पडला. मात्र उद्घाटनानंतर अपघाताच्या मालिका सुरु असल्याने समृद्धी महामार्ग चर्चेत आला आहे. अशातच आता औरंगाबादच्या वैजापूर जवळील गलांडे वस्तीजवळील एका धावत्या कारने पेट घेतला आहे. आगीचे प्रमाण एवढे होते की, कार काही क्षणात जळून खाक झाली आहे. तर आग लागलेली कार पुणे येथील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, नितीन सिंह राजपूत यांची गाडी असल्याचे देखील समोर आले.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, राजपूत कुटुंब समृद्धी महामार्गावरून शिर्डी मार्गे पुण्याला जात होते. दरम्यान वैजापूरच्या गलांडे वस्तीजवळ कार येताच गाडीतून धूर निघत असल्याचे नितीन सिंह राजपूत यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी गाडीचा वेग कमी करून कार रस्त्याच्या कडेला उभी केली. कारमधून खाली उतरून पाहणी केली असता, समोरील भागात आग लागल्याचे त्यांना पाहायला मिळाले. त्यामुळे त्यांनी तात्काळ गाडीत बसलेल्या कुटुंबातील सदस्यांना बाहेर काढले. पण अवघ्या काही मिनिटात आगीचा भडका उडाला आणि काही क्षणात कार जळून खाक झाली. त्यामुळे नितीन सिंह राजपूत यांनी गाडी थांबवल्याने मोठा अनर्थ टळला आणि राजपूत कुटुंब थोडक्यात बचावले.

# ग्रा.पं.चा हायटेक प्रचार!



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गावाची निवडणूक झाली आहे. ग्लोबल उमेदवारांचा ग्रामपंचायत निवडणूकीत हायटेक प्रचार ग्रामपंचायतीच्या रणधुमाळीमुळे उमेदवारांचा पारंपारिक प्रचाराबरोबर हायटेक प्रचार जोरात सुरु आहे. यामुळे दरवर्षी गावच्या पारावर होणाऱ्या चर्चांची जागा यंदा हायटेक प्रचाराने घेतली आहे. त्यामुळे फक्त गावात फिरुन केला जाणारा प्रचार यावेळी मात्र मोबाईल, फेसबुक तसेच सोशल मिडियाच्या माध्यमातून थेट ग्लोबल केला जातोय. याचविषयी पैठण तालुक्यातील होत असलेल्या 22 ग्रामपंचायत निवडणूकीच्या अनुशंगाने पैठण पोलीसांच्या वतीने कुरणपिंपरी येथे पथ संचलन करून सोशल मिडीयावर होत असलेल्या प्रचार यंत्रणा मुळे कुणाच्या भावना दुखवु नये असे अवाहन पोलीसाच्या वतीने करण्यात आले आहे. तालुक्यातील 22 गावातील ग्रामपंचायत निवडणूकीत आत राजकारण तापले असुन यात हायटेक प्रचार करण्यात येत आहे.

# डॉ. भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सवी वर्षानिमित्त एमबीबीएसच्या गरीब विद्यार्थ्यास एक लाखाची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** येथील एमबीबीएस पात्र विद्यार्थ्यांचा पैशा अभावी प्रवेश हुकण्याची माहिती उपलब्ध होताच श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी त्या गरीब विद्यार्थ्यास संस्थेतर्फे एक लाख रुपयाची भरीव मदत संस्थेचे सचिव माजी आमदार गुरुनाथराव कुरुडे यांच्याहस्ते छत्रपती शंभूराजे इंग्लिश स्कूल येथे एक लाख रुपये विद्यार्थ्यास रोख देण्यात आले.यावेळी विद्यार्थी लक्ष्मीकांत कहाळेकर,त्याची आई स्वाती कहाळेकर, संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील पेठकर, प्राचार्य डॉ. अशोक गवते, प्राचार्य डॉ. गिरमाजी पगडे, शिवाजी मुंडे, मलकुअप्पा शेट्टे, मुख्याध्यापक दिलीप बोधगिरे, मुख्याध्यापक संभाजी उंद्रटवाड, मुख्याध्यापक हरिहर चिवडे, उपमुख्याध्यापक आढाव, प्रा. पांडुरंग पांचाळ, प्रा.उमेश पुजारी, प्रा.प्रदीप गरूडकर, प्रा.सुभाष वाघमारे आदी उपस्थित होते. लक्ष्मीकांत चंद्रकांत कहाळेकर हा लोहा येथील गरीब होतकरू विद्यार्थी आहे. लहानपणीच वडिलांचे छत्र हरवल्याने त्याच्या आईने शिवणकाम करून त्याला शिकविले. एमबीबीएस शिक्षणाला एक गुण कमी पडल्याने लक्ष्मीकांतचा गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज ऐवजी प्रायव्हेट कॉलेजला नंबर लागला. प्रायव्हेट फिसची भरने त्याला शक्य नव्हती. फिस अभावी त्याला एमबीबीएसच्या शिक्षणा पासून वंचित राहावे लागण्याची शक्यता होती.हि बाब कंधारचे प्रसिद्ध व्यावसायिक शिवा मामडे यांनी प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांना फोनवर कळवली भाऊंनी क्षणाचाही विलंब न करता सामाजिक बांधिलकी जोपासली.आपल्या परिसरातील विध्यार्थ्यांना आपण मदत करू त्याला आधार देऊ, असे म्हणाले व लगेच त्यांनी



संस्थेच्या वतीने एक लक्ष रुपयांची भरीव मदत दिली. श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक संचालक डॉ.भाई धोंडगे यांच्या शतकोत्सवी वर्षानिमित्त संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी कोरोना काळात मुख्यमंत्री सहायता निधीस एक लक्ष, पुरग्रस्तांसाठी एक लक्ष, श्री शिवाजी विधी महाविद्यालयातील अपंग खेळाडूला एक लक्ष रुपयाची मदत केली आहे. कोरोनाकाळात पोरके झालेल्या विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांना आधार दिला. याच बरोबर कोरोना योधांचा सत्कार असो की कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी सुरू करण्यात आलेला भाऊचा डब्बा असो, अशा अनेक सामाजिक कार्यात संस्थेचा नेहमी पुढाकार असतो.लक्ष्मीकांतला मदतीचा हात देऊन भाई केशवराव धोंडगे व भाई गुरुनाथराव कुरुडे यांचा गोरगरीबांच्या कल्याणासाठी संस्थाचा हा आदर्श वसा प्रा. डॉ.पुरुषोत्तम धोंडगे हे चालवीत आहेत.



# आपेगाव सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी औटे, व्हॉ. चेअरमनपदी थोरात बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी सुनील औटे व उपाध्यक्ष पदी संभाजी थोरात यांची बिनविरोध निवड सोमवारी दि.१२ रोजी करण्यात आली. ही निवड प्रक्रिया पैठण सहकार कार्यालयात अध्याशी अधिकारी श्रीमती वैशाली येसगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली त्यास संस्थेचे सचिव अशोक सोळस यानी काम पाहिले. आपेगाव येथील सोसायटी संचालक मंडळाची निवडणूक मार्केट कमेटीचे माजी सभापती आन्नासाहेब औटे व खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन प्रल्हाद औटे यांच्या नेतृत्वाखाली ३० नोव्हेंबर रोजी निवडणूकीत ज्ञानराज शेतकरी विकास पॅंनलचा विजय झाला होता ही निवडणूक सर्वानुमते बिनविरोध करण्यात आली . यावेळी चेअरमन सुनील औटे, व्हॉ. चेअरमन संभाजी थोरात व संचालक बद्रीनाथ औटे, महेमुद पठाण, भगवान ठेणगे, केशव थोरात, दादासाहेब घोडके, सुखदेव मिसाळ, एकनाथ वाडाभरे, राहीबाई घेर, सावित्रीबाई औटेसह खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन प्रल्हाद औटे,प्रा.युवराज औटे, ज्ञानेश्वर थोरात, रामचंद्र औटे, गणेश औटे आन्नासाहेब ठेणगे, महेश औटे, महादेव पानखडे, नानासाहेब मोरे,लहु औटे, सुमित औटे, दत्तात्रय औटे, महेश औटे यांची उपस्थिती होती.



# विमा कंपनीचा भोंगळ कारभार; शेतकरी पीकविमा योजनेपासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळरबारा परिसरात प्रधानमंत्री फसल विमा योजनेच्या लाभापासून पीक विमा भरून नुकसानीची तक्रार केलेले शेतकरी विमा कंपनीच्या मनमानी कारभारामुळे लाभापासून वंचित राहण्याच्या भीतीमुळे हवालदिल झाले असून त्याच या पीक विमा कंपनीला काही सोयरसुतक नसल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात दिसून येत आहे.
तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी पेरणीच्या वेळेस प्रधानमंत्री फसल विमा योजनेतर्गत पावसाळा सुरु होतांना आपापल्या शेतातील पिकांचा CSC सेंटरमध्ये पैसे भरून विमा भरला खरा नंतर सोयगाव तालुक्यातील स्थिती बदलली पावसामुळे पिकांचे नुकसान झाले त्यावेळेस फसल बिमा कंपनीकडून ७२ तासाच्या आत आपल्या पिकाच्या नुकसानीची




माहिती " क्रॉप इन्शुरन्स एप वरून शेतकऱ्यांना देण्याचे आव्हाहन शेतकऱ्यांना करण्यात आले, यात बऱ्याच शेतकऱ्यांना लिहिता वाचता येत नसल्याने ऑनलाईन नोंदणीची ताराबळ उडाली तरी हवालदिल शेतकऱ्याने नुकसानीची नोद करून दिली. नंतर पंचनामा करण्याची जबाबदारी कंपनीची असतांना त्यांनी ह्या कामासाठी इतरांना अधिकार दिले त्यांनी शेतकऱ्याच्या पंचनाम्या साठी आर्थिक मागणी करत ज्या शेतकऱ्यांनी पैसे दिले त्यांचेच पंचनामे केले त्यामुळे बरेच शेतकरी पंचनामे न झाल्यामुळे या लाभापासून वंचित राहिल्याचे कंपनीच्या प्रतिनिधी कडून शेतकऱ्यांना सांगण्यात आले, त्यामुळे तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकरी बिमा कंपनीचा विम्याचे पैसे भरून सुद्धा लाभापासून वंचित राहतो काय? या भीतीपोटी सावळदबारा परिसरातील शेतकरी हवालदिल झाला आहे.



# मंत्रिमंडळातून चंद्रकांत पाटील यांची हकालपट्टी करा

## धुळ्यात आंबेडकरवादी संघटनांसह सर्वपक्षीय आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** उच्च शिक्षण आणि तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महात्मा फुले, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तसेच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या विरोधात आज धुळे शहरात सर्व आंबेडकरी संघटनेसह सर्व पक्षीय आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चा हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.
राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद धुळे शहरात उमटले.
राज्यामध्ये जेव्हापासून शिंदे फडणवीस सरकार अस्तित्वात आलेले आहे, तेव्हापासून राज्यपाल व सरकारमधील काही मंत्री हे महापुरुषांच्या बद्दल जाणून बुजून आक्षेपार्ह विधान करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे महापाप करीत आहेत. या वाचाळवीरांना तातडीने समज द्या, आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांची राज्य सरकारने अकलपट्टी करा अन्यथा आंबेडकरवादी संघटना, कार्यकर्ते जशास तसे उत्तर देतील. असा गंभीर इशारा देखील यावेळी देण्यात आला.
धुळे शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यापासून या आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते हा आक्रोश मोर्चा महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापुढेला अभिवादन करून हा मोर्चा आग्रा रोड मार्गे धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात मोर्चात सहभागी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.
यावेळी माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाट, शशिकांत वाघ, शिवसेनेचे महेश मिस्त्री, अतुल सोनवणे, हिलाल माळी, राष्ट्रवादीचे रणजीत राजे भोसले, महेंद्र शिरसाठ, राज चव्हाण, शंकर खरात, बाब हातेकर, अनिल दामोदर, योगेश ईशी, किरण जोंधळे, डॉ. शरद भामरे, किराणा गायकवाड विशाल पगारे, किरण इशी, मुकेश खरात, आनंद शेंगदाणे, भैया पारेराव, सिध्दार्थ वाघ, विवेक नेतकर, सुगत मोरे, बापू भामरे, लोटान वाघ, नाना नेरकर, विनोद केदार, बबलू खरात, सुंदर भोई, पुनम शिरसाठ संघमित्रा बैसाने, कल्पना सामुद्रे, प्रा.भाग्यश्री बैसाने, ॲड. धनश्री बैसने, सरोज कदम, नैना दामोदर, शारदा भामरे, वनिता, गरुड, निर्मला शिंदे, बबीता मोरे, अक्षरा नांद्रे आदी उपस्थित होते.

# डॉ. वेणूगोपाल पंडित यांचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या वैद्यकीय अधिकारी (गट - अ) परीक्षेत डॉ. वेणूगोपाल पंडित यांनी घवघवीत यश मिळवले आहे.याबद्दल त्यांच्यावर चोहोबाजूनी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने वैद्यकीय व आरोग्य सेवा (गट - अ) कान,नाक व घसा विशेषज्ञ वैद्यकीय अधिकऱ्यांची परीक्षा व मुलाखत घेतली होती.याची नुकतीची मेरिट लिस्ट आयोगाने घोषित केली असून यामध्ये धर्माबादचे डॉ.वेणूगोपाल पंडित यांची निवड झाली आहे. त्यांच्या यशाबद्दल शिवसेना उप जिल्हाप्रमुख (ठाकरे गट) गणेश गिरी, बालाजी बनसोडे, जेष्ठ शिवसैनिक गणपत कात्रे, माजी सभापती मारोती कागेरू, इळेगावकर, पत्रकार बाबुराव गोणारकर यांनी डॉ.वेणूगोपाल पंडित यांचा सत्कार केला.



# रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे शिवाजी विद्यालयात प्रभारी सरपंच मो.आरिफ मो. लुखमान व प्रा. जीवन कोलते पाटील (सामाजिक कार्यकर्ते) यांनी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवाजी विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. वाटप करताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पद अधिकारी उपस्थित होते. माजी जि. प. अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप अजिंठा शिक्षण सस्थाचे अध्यक्ष तथा औरंगाबाद जि. प. अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवाजी विद्यालयात येथील शाळेत विध्याथ्र्यांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच सावळदबारा ग्रामीण रुग्णालयात फळे वाटप करीत वाढदिवस साजरा केला.यावेळी प्रा.जिवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते),राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सावळदबारा अध्यक्ष मो.आरिफ मो.लुखमान, वसंता चोरमारे, रवींद्र गायकवाड (मोलखेडा), सोयगाव तालुका अध्यक्ष डॉ. इंद्रजित साळुंखे, शहरप्रमुख रवींद्र काळे, उपप्राचार्य शिरीष पवार, कुरपटवार निलेश गाडेकर, दीपक देशमुख, कृष्णा जुनघरे, अजय नेरपगारे, डॉ. आबीब, सुनील वानखेडे, चेतन वाकालकर, सुधाकर सोहनी, मुख्याध्यापक किरण पाटील, रविंद्र देशमुख, अनीस तडवी, आदिसह तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे यांची भेट व सामाजिक चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे राज्यमंत्री दर्जा असलेले माजी अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश मंत्री, अभ्यासू व अत्यंत कमी वयांत आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या आणि विद्वत्तेच्या जोरावर राजकारण व समाजकारणाबरोबरच शैक्षणिक क्षेत्रांत उत्तुंग ख्याती निर्माण केलेले अमित गोरखे यांची पुणे निगडी येथील त्यांच्या नॉव्हेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कॅंटेरिंग टेक्नॉलॉजी याठिकाणी संभाजीनगर शहरातील मातंग समाजातील शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांच्यासोबत विविध महत्वपूर्ण असलेल्या सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा करुन महत्वाचे निर्णय घेण्यात आले. व सोबतच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातर्फे सुरु झालेल्या रुपये 1 लाखाच्या थेट कर्ज योजनेसाठी लाभार्थ्यांनी 2 जामीनदार देण्याची असलेली जाचक अट रद्द करुन विना जामीनदार प्रस्ताव स्वीकारुन समाजातील गरजू नागरिकांना त्याचा फायदा होईल अशी तरतूद करा अशी मागणी करण्यांत आली. यांवेळी त्यांनी या विषयांवर सकारात्मक दुजोरा देऊन लवकरच याचा पाठपुरावा करुन ही अट रद्द करु असा शब्द शिष्टमंडळाला दिला. यावेळी माजी नगरसेवक तथा औरंगाबाद जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजू भाऊ आहिरे, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप मानकर, उद्योजक अशोक दादा शिरसाठ, कॉन्ट्रॅक्टर अशोक ताठे, माणिक जोगदंड, मंगेश टेकाळे, समर्जीत पाटील, कुलदीप जोगदंड आदींची उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in